महाराणी ताराबाई

महाराणी ताराबाई

अशोक बेंडखळे

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ११८२

ISBN No. 978-93-5795-00 ????

महाराणी ताराबाई
अशोक बेंडखळे

पहिली आवृत्ती : २५ नोव्हेंबर २०२२

© अशोक बेंडखळे
२/३०९ 'डी', विमान दर्शन, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९.
भ्रमणध्वनी : ९८६९२५८५८५
ashok.bendkhale@gmail.com

प्रकाशन
ग्रंथाली
१०१, १/बी विंग 'द नेस्ट',
पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी,
टायकलवाडी, स्टार सिटीसमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
granthalibooks@gmail.com

मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे : प्रमोद जोशी

अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

मूल्य १०० रुपये

छोटा नातू अर्जुन यास–
दुबईत राहून मराठी शिकण्याची तुझी धडपड कौतुकास्पद

मनोगत

छोट्या मुलांसाठी इतिहासातील पराक्रमी स्त्रियांची चरित्रे लिहायची हे माझ्या मनात खूप वर्षांपासून होते. सहा वर्षांपूर्वी राजा प्रकाशनाचे मुळे यांनी सुचवल्याप्रमाणे आधुनिक काळातील पाच स्त्रियांची चरित्रे लिहिली आणि 'महाराष्ट्राच्या पंचकन्या' या मालिकेअंतर्गत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे आणि आनंदीबाई कर्वे या छोटेखानी पुस्तकांची निर्मिती झाली. डोक्यातला मूळ विचार गेला नव्हता. त्यातून राणी लक्ष्मीबाईंचे छोटे चरित्र लिहिले आणि 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांना भेटलो. ते तात्काळ म्हणाले, 'एक पुस्तक का? पाच पुस्तके करूया.'' अशाप्रकारे 'ऐतिहासिक पंचकन्या' अंतर्गत राजमाता जिजाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई अशी पाच पुस्तके तयार झाली.

पराक्रमी ताराबाईंबद्दल सांगायचे म्हणजे त्यांनी वयाच्या २५व्या वर्षी मराठी राजकारणात प्रवेश केला आणि ८६व्या वर्षापर्यंत त्या क्षेत्रात त्यांचा अविरत प्रवास झाला. महाराणी ताराबाईंनी हातात तलवार घेऊन आणि घोड्यावर स्वार होऊन अनेक लढायांचे नेतृत्व केले, आपल्या कर्तृत्वाने मराठी राज्य तेजस्वी आणि समृद्ध केले. त्यांचा विशेष म्हणजे औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूला आपल्या पराक्रमाने आणि मुत्सद्देगिरीने चीत करून मराठी राज्याचे रक्षण केले. इतकेच नव्हे तर मराठी राज्याचा दरारा दक्षिणोत्तर वाढवला. त्यामुळे मराठा इतिहासातील एक लढवय्यी महान स्त्री म्हणून महाराणी ताराबाई यांचे स्थान नेहमी अढळ राहणार आहे.

ताराबाईंचे हे छोटे चरित्र प्रसिद्ध होताना खूप आनंद होतो आहे. चित्रकार प्रमोद जोशी यांनी प्रसंगानुसार सुंदर रेखाचित्रे काढली आहेत, मुखपृष्ठही मोहक रेखाटले आहे. त्यांचे तसेच पुस्तक देखण्या रूपात प्रसिद्ध केल्याबद्दल 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांचे मनःपूर्वक आभार!

■ **अशोक बेंडखळे**

अनुक्रम

१. प्रांरभीचे दिवस / १
२. राजारामराजे महाराष्ट्राबाहेर / ८
३. राजाराम महाराजांचे निधन / १६
४. राज्यकारभाराची सूत्रे ताराबाईंकडे / २२
५. ताराबाईंची चौफेर भरारी / २७
६. शाहूराजेंबरोबर सत्ता स्पर्धा / ३८
७. कोल्हापूरची रक्तहीन क्रांती / ४१
८. सातारचे राजकारण / ४४
९. रामराजा राजसिंहासनावर / ४८
१०. ताराबाई आणि पेशवे / ५१
११. राज्यकारभार पुन्हा ताराबाईंकडे आणि अखेर / ५४

१. प्रारंभीचे दिवस

मराठ्यांच्या इतिहासातील एक शूर वीरांगणा म्हणून महाराणी ताराबाई या व्यक्तिमत्त्वाचा निर्देश करता येतो. इतिहासामधील नामवंत स्त्री व्यक्तिमत्त्वामध्ये राजमाता जिजाई, महाराणी येसूबाई वा अहिल्याबाई होळकर यांनी रणांगणामागे राहून उत्तम राजकारण केले, राज्यकारभार सांभाळला मात्र रणांगणावर प्रत्यक्ष पराक्रम गाजविला नाही. त्याबाबतीत ताराबाईंची तुलना झांशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या मर्दुमकीशी करता येते. महाराणी ताराबाई हे अत्यंत धाडसी, कर्तृत्ववान, करारी आणि महत्त्वाकांक्षी असे स्त्री व्यक्तिमत्त्व होते. करवीर राज्याची संस्थापिका म्हणून त्यांनी शिवाजी महाराज आणि संभाजी राजे यांच्या मृत्यूनंतर केवळ मराठ्यांच्या राज्याचे रक्षण केले नाही तर त्याचा अनेक दिशांनी विस्तार केला. आणि म्हणून महाराणी ताराबाई यांचे नाव मराठ्यांच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. अशा या रणरागिणी स्त्री व्यक्तिमत्त्वाचा आलेख कुणालाही अभिमान वाटावा असा आहे.

मराठ्यांच्या सैन्यामधील सरसेनापती हंबीरराव मोहिते हे

ताराबाईंचे वडील. कराडजवळील तळबीड या गावाचे ते पराक्रमी सरदार. १६७४ मध्ये चिपळूण येथे झालेल्या एका युद्धात त्यांनी गाजवलेल्या अतुलनीय पराक्रमामुळे शिवाजी महाराजांनी त्यांना 'सरनौबत' ही पदवी बहाल केली. हंबीरराव मोहित्यांची मुलगी म्हणजे ताराबाई. तिचा जन्म १६७५ मध्ये झाला आणि तिचे माहेरचे नाव सीताबाई असे होते.

ताराबाईंची आजी तिला मोहिते घराण्याचा इतिहास सांगे आणि त्यातून या पराक्रमी लढाऊ घराण्याचे दर्शन ताराबाईंना लहानपणीच घडले. ताराबाई आपल्या पित्याची लाडकी लेक होती. त्यामुळे ती नेहमी आपल्या पित्याबरोबर असे. जात्याच तिला युद्धकलेची आवड असल्याने तिच्या पित्याने लहानपणीच तिला सर्व प्रकारचे युद्ध शिक्षण दिले. घोड्यावर बसण्यातही ती पटाईत होती. पित्याच्या सहवासात राजकारणाचे अनेक डाव तिला अवगत झाले होते.

तळबीड गावची पाटीलकी तुकोजी मोहित्यांकडे इ.स. १६२२च्या काही वर्षे अगोदर आलेली होती. तुकोजी मोहित्यांना संभाजी आणि

धाराजी असे दोन पुत्र होते. याशिवाय तुकाबाई नावाची मुलगी होती. संभाजी आणि धाराजी यांचे विवाह घाटगे आणि घोरपडे घराण्यातील मुलींशी झाले होते. घाटगे आणि घोरपडे दोघेही विजापूरच्या आदिलशहाच्या दरबारात चाकरी करीत होते. निजामशाहीचे ते पराक्रमी सरदार होते. त्यांच्या पराक्रमामुळे निजामाचा पंतप्रधान मलिकंबर शहाजी राजांचा मत्सर करू लागला होता. त्याचा त्रास असह्य झाल्यामुळे शहाजी राजे निजामशाहीला कंटाळून विजापूरच्या आदिलशहाकडे नोकरीस आले. तिथे त्यांना सरलष्कर हा मोठा हुद्दा मिळाला.

एकदा मलिकंबरने शहाजी राजांना साळव्याच्या घाटात कचाट्यात आणले. त्यावेळी संभाजी मोहित्यांच्या पराक्रमामुळे शहाजी राजे निजामाच्या फौजेच्या पकडीतून बाहेर आले आणि बाजी मलिकंबरवर उलटवली. या पराक्रमाची बक्षिसी म्हणून शहाजी राजांनी संभाजी मोहित्यांना आदिलशहाकडून तळबीडची देशमुखी मिळवून दिली. या उपकाराची फेड म्हणून संभाजी मोहित्यांनी शहाजी राजांशी लग्नसंबंध जोडले. त्यांनी आपली बहिण तुकाबाईचा विवाह शहाजी राजांशी लावून दिला. घाटगे, घोरपडे आणि भोसले ही त्यावेळी महाराष्ट्रातील प्रतिष्ठित घराणी होती. अशाप्रकारे विवाह संबंधाने ती घराणी एकमेकांशी जोडली गेली.

या संभाजी मोहित्यांना हंबीरराव हा पुत्र आणि सोयराबाई ही कन्या होती. सोयराबाईंचा विवाह छ. शिवाजी महाराजांशी त्यांची द्वितीय पत्नी म्हणून झाला. आणि हंबीरराव मोहित्यांची कन्या ताराबाई शिवाजी महाराजांचा कनिष्ठ पुत्र म्हणजे राजारामराजे यांची राणी म्हणून भोसले कुटुंबात आली. भोसले-मोहिते घराण्याचा संबंध असा घनिष्ट होत गेला.

राजाराम आणि ताराबाई यांचा विवाह छ. संभाजी राजे यांच्या पुढाकाराने १६८४ च्या सुमारास झाला.

त्यापूर्वी शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडावर एक नाट्य घडले होते. आणि ते होते संभाजी राजांच्या बाबतीत. त्यावेळी संभाजी राजांना ताराबाईंचे वडील सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोठे साहाय्य केले. घडलेली गोष्ट अशी होती –

दक्षिणेकडील मोहीम आटोपून शिवाजी राजे रायगडावर परत आले (१६८०) आणि थोड्याच दिवसात आजारी पडले. त्यावेळी संभाजी राजे पन्हाळगडावर नजरकैदेत बंदिवान होते. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांना त्यांच्या मृत्यूची खबर देण्यात आली. कनिष्ठ पुत्र राजारामाने त्यांना मंत्राग्नी दिला. रायगडावरील प्रमुख मुत्सद्दी एक कुटिल डाव त्यावेळी रचित होते. त्या अधिकाऱ्यांमध्ये मोरोपंत पिंगळे, आवजी चिटणीस, अण्णाजी दत्तो वगैरे मातब्बर मंडळी होती. राजारामाची आई म्हणजेच हंबीरराव मोहित्यांची सख्खी बहीण महाराणी सोयराबाई यांची संमती या कटाला होती.

ज्येष्ठ पुत्र संभाजी राजांऐवजी राजारामाला गादीवर बसवण्याचा

बेत मुलकी मंत्री मुत्सद्यांचा असला तरी फौज त्यांच्या बाजूने नव्हती. आणि त्याला कारण होते सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची राजनिष्ठा आणि दूरदृष्टी. हंबीररावांना शिवाजी महाराजांबरोबर संभाजी राजांचा पराक्रम माहीत होता. शिवाजी राजे औरंगजेबाच्या कैदेतून शिताफीने सुटले आणि महाराष्ट्रात परत आले. त्यानंतर त्यांनी मोगलाकडे गेलेले किल्ले परत जिंकले, आणखी काही प्रदेश ताब्यात घेतले. आणि पुढे तर मराठ्याचे स्वतंत्र हिंदवी स्वराज्य स्थापन केले. हे सगळे मोगल बादशहाला डाचत होते. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर तो स्वराज्यावर हल्ला करील ही हंबीररावांची एक अनुभवी सेनापती म्हणून अटकळ होती.

अशा परिस्थितीत मुत्सद्दी मंत्र्यांनी छत्रपती पदावर एक अननुभवी राजारामाला बसविलेला हंबीररावांना पसंत पडले नाही. त्यावेळी राजाराम केवळ दहा वर्षांचा होता. त्याला युद्धाचा, त्यातील डावपेचांचा काही अनुभव नव्हता. तर संभाजी राजे राजनीति आणि युद्ध कौशल्य दोन्ही बाबतीत वरचढ होते. शिवाय शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र म्हणून गादीवर त्यांचा हक्क होता. औरंगजेबाच्या कूटनीतीचा आणि मोगलांच्या प्रचंड लष्करी सामर्थ्याचा विचार करता संभाजी राजे हे छत्रपती पदासाठी योग्य होते. आणि म्हणून सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी आपली लष्करी ताकद संभाजीराजांच्या मागे उभी केली. त्यामध्ये त्यांनी आपली वैयक्तिक नातीसुद्धा राष्ट्रहितापुढे बाजूला ठेवली.

ताराबाईंना आपले वडील हंबीरराव मोहित्यांचा हा मनाचा मोठेपणा लहानपणीच दिसला होता.

हंबीररावांनी दिलेल्या लष्करी पाठबळामुळे संभाजी राजे रायगडावर आले. त्यांनी सत्ता हाती घेतली. राणी सोयराबाईंना बाजूला केले पण त्यांचा योग्य मान राखला. राजाराम वयाने लहान होते त्यांची सुद्धा शंभू राजांनी काळजी घेतली.

इ.स. १६८४ च्या सुमारास राजाराम आणि सीताबाई (हंबीरराव मोहित्यांची कन्या) यांचा विवाह संभाजी राजे यांच्या पुढाकारामुळे झाला. विवाहानंतर त्या ताराबाई किंवा ताराऊ या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या.

संभाजी राजांनी गनिमी कावा युद्ध तंत्राने बादशहा औरंगजेब याला त्रस्त करून सोडले. मराठ्यांशी लढताना बादशहाला कळून चुकले की, निव्वळ मोठे सैन्य आणि भरपूर शस्त्रसाठा असेल म्हणून युद्ध जिंकता येत नाही. संभाजी राजांच्या युद्ध पद्धतीने मोगल सेना हतबल झाली होती. मोगल-मराठ्यांचा संघर्ष महाराष्ट्रात पेटला. या घडमोडीत मराठी सैन्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते आणि मोगल सरदार फर्जाखान यांची गाठ कराडजवळील कडेगावाजवळ पडली. त्या मोहीमेत हंबीररावांना मोगलांच्या एका तोफगोळ्याचा फटका बसला आणि ते जागीच ठार झाले. (ऑक्टोबर १६८७).

आपल्या वडिलांच्या अपघाती निधनाने ताराबाई शोकसागरात बुडाल्या. रायगडावरील नजरकैदेतून बाहेर पडून त्या आपल्या गावी तळबीडला माहेरी आल्या. तिथे जुन्या आठवणी काढून त्यांनी आपले मन मोकळे केले.

सरनौबत हंबीरराव मोहित्यांच्या वीरमरणाने संभाजी राजांचा एक मुख्य आधार गळून पडला होता. संभाजी राजांना छत्रपतीपद नाकारले गेल्याने त्यांचा स्वभाव संशयी बनला होता. कुठल्याही मुत्सद्यांवर त्यांचा विश्वास बसत नव्हता, विश्वासू हंबीररावही त्यांना सोडून गेले होते. उत्तर हिंदुस्थानतला कवी कलश त्यांचा मित्र बनला होता. फौजी ताकदीवर मराठ्यांना जिंकता येत नाही हे लक्षात आल्यावर औरंगजेबाने फितुरीचा मार्ग पत्करला.

संभाजी राजे आणि कवी कलश रायगडावर येण्यास निघाले असता वाटेत संगमेश्वरजवळ मोगल तुकडीने त्या दोघांना कैद केले.

राजांच्या हालचालीची खबर कुणा फितुराने मोगलांना दिली होती. औरंगजेबाने संभाजी राजांचा छळ करून त्यांचा वध केला. (१६८९).

संभाजी राजांच्या वधाने औरंगजेबाला आपण हिंदवी स्वराज्य नामशेष करू असे वाटत होते. या कल्पनेचा तो आसूरी आनंद घेऊ पहात होता. मात्र झाले उलटेच. संभाजी राजांच्या देह त्यागाने महाराष्ट्राच्या घराघरात मोगलांच्या पाशवी सेनेविरुद्ध चीड उत्पन्न झाली, त्वेषाचे अंगार भडकवू लागली.

ताराबाईंचे मनसुद्धा मोगलाच्या पाशवी अत्याचाराविरुद्ध पेटून उठले. औरंगजेबाला कठोर शिक्षा देण्यासाठी त्यांनी आपली तयारी सुरू केली.

■

२. राजारामराजे महाराष्ट्राबाहेर

संभाजी राजांच्या निधनाने महाराणी येसूबाईंच्या दुःखाला सीमा राहिली नव्हती. त्यात मोगल सेनानी झुल्फिकारखानाने राजधानी रायगडाला वेढा घातलेला. येसूबाईंने वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून तातडीने सर्व मुत्सद्दी व सरदार यांची मसलतीसाठी रायगडावर बैठक बोलावली आणि तिथे जाहीर केले की, 'माझा मुलगा शिवाजी खूपच लहान आहे. युद्धाची जोखीम त्याला पेलवणार नाही' आणि पुढे सूचना केली की, माझे दीर राजाराम राजे यांना छत्रपतीपद द्यावे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली युद्ध पुढे चालवावे.

त्या बैठकीत सरदारांनी असे मत मांडले की, राजाराम महाराजांनी रायगडावर राहू नये तर बाहेर पडून सतत फिरते रहावे आणि गनिमी काव्याने मोगलांच्या फौजेशी लढत द्यावी.

त्या बैठकीत असेही ठरले की, राजाराम महाराजांनी थोडा काळ महाराष्ट्रात राहून पुढे दक्षिण हिंदुस्थानातील जिंजीला आपले मुख्य ठाणे करावे, ज्यामुळे मोगल सैन्य विभागले जाईल आणि मराठी मुलुखात मोगल सैन्याविरुद्ध लढणे सोपे होईल.

राजाराम महाराजांबरोबर जिंजीस त्यांचा कबिला जाणार नाही

हे ताराबाईंनी जाहीर केले. कुणीतरी शंका काढल्यावर त्यांचे मर्दानी उत्तर होते, 'न जमायला काय जाते? आम्ही सरनौबत खंबीरराव यांच्या कन्या आहोत.' येसूबाईंनीसुद्धा बालशिवाजी या पुत्राबरोबर रायगडावर राहण्याचा निश्चय व्यक्त केला. त्यामुळे मोगली फौज रायगडाला वेढा घालून बसेल आणि बाकीच्या मोर्चांवरचा ताण कमी होईल हा त्यामागे उद्देश होता.

ठरल्याप्रमाणे राजाराम महाराज ताराबाईंसह रायगडावरून वेषांतर करून बाहेर पडले आणि प्रतापगडाकडे गेले. तिथून ती दोघं पन्हाळ्याला जाऊन पोचली.

मोगल सैन्य रायगड किल्ला त्वेषाने लढवत होते. शेवटी फंदफितुरीने गडावर मोगल सेनेला प्रवेश मिळाला आणि मुगल सरदार झुल्फिकारखानने रायगड जिंकला.

महाराणी येसूबाई आणि पुत्र शिवाजी मोगल सैन्याच्या हातात सापडले. त्या दोघांना बादशहापुढे उभे करण्यात आले. महाराष्ट्रातला उद्रेक लक्षात घेऊन औरंगजेबाने त्यांना राजकीय कैदी केले आणि त्यांची आपल्या छावणीबरोबर नीट बाडदस्त ठेवण्यास सूचना दिल्या.

औरंगजेबाने येसूबाई आणि तिचा पुत्र शिवाजी (शाहू हे त्याला त्याने दिलेले नाव) यांच्या नावाच्या प्रारंभी उपयोग करून मराठी सैन्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण मराठी सरदार या भ्रष्टाचाराला बळी पडले नाहीत. त्यांनी राजाराम महाराजांचेच नेतृत्व उचलून धरले.

मराठ्यांची फौज प्राणपणाने लढत होती. पण मोगल सैन्य संख्येने प्रचंड होते. स्वराज्य धोक्यात येत आहे हे लक्षात येताच मोगल सैन्याचं लक्ष विचलित करण्यासाठी राजाराम महाराजांनी पन्हाळ्याहून जिंजीला जाण्याचा निर्णय घेतला.

परंतु जिंजी हे ठिकाण महाराष्ट्रापासून सुमारे सहाशे मैल दूर

होते. एवढ्या दुरून महाराष्ट्राचा राज्यकारभार पाहणे ही सर्वथा अशक्यप्राय गोष्ट होती. यासाठी त्यांनी राज्यव्यवस्था पाहणारे आणि मोगलांबरोबरचे युद्ध चालविणे यासाठी एक राजमंडळ स्थापन केले. या राजमंडळावर अध्यक्ष म्हणून ताराबाईंना नेमले. या राजमंडळात राज्यव्यवस्थेसाठी प्रामुख्याने रामचंद्रपंत आणि शंकरजी नारायण या दोन मुलकी अधिकाऱ्यांची नेमणुक केली तर फौजेचे प्रतिनिधी म्हणून संताजी घोरपडे व धनाजी जाधव या दोन सेनानीस घेतले.

तसेच राजकारभार व्यवस्थित चालावा म्हणून मराठी राज्याचे दोन विभाग केले. उत्तर भाग रायगड केंद्र धरून ठेवला होता आणि त्याचे राजप्रमुख शंकरजी नारायण यांना नेमले. तर दक्षिण भागाचे केंद्र सातारा मध्यवर्ती धरून केले. त्याचे राजप्रमुख म्हणून रामचंद्रपंत यांना अधिकार दिले. या दोन्ही राजप्रमुखाना छत्रपतींचे राज्यकारभाराचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. फौजी आणि मुलकी निर्णय राजमंडळ घेई आणि त्याच्या अध्यक्षा महाराणी ताराबाई होत्या.

अशा प्रकारे संभाजी राजांच्या नंतर मोगलांच्या फौजेबरोबर प्रत्यक्ष लढाईच्या धामधुमीत महाराणी ताराबाईंना सामील व्हावे लागले.

आपले लढवय्ये वडील सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा वारसा लाभलेल्या ताराबाईंनी सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या दोन्ही गोष्टी अतिशय कसोशीने सांभाळल्या. त्यामुळे पर्शियन इतिहासकार काफीरखान याने राजारामाची पत्नी ताराबाई ही मोठी बुद्धिमान आणि धूर्त होती असे लिहून ठेवले आहे.

संभाजी राजांच्या निघृण वधामुळे मराठे चवताळून उठले. मोगल सैन्याने कत्तली केल्या, अनेक गावे ओसाड केली, रक्तपात केले, अत्याचार केले. मात्र या अतिरेकी मार्गांचा मराठ्यांच्या बाबतीत काही उपयोग होत नाही हे पाहून बादशहा औरंगजेबाने लाचलुचपतीचा मार्ग अनुसरला. त्याने मराठी सरदारांना सनदा देण्यास सुरुवात केली.

बादशहाने देऊ केलेला पैसा, मानमरातब, किताब आणि वतने यांची भुरळ मराठी लढवय्या सरदारांना पडू लागली.

खरं म्हणजे वतनाची पद्धत शिवाजी महाराज आणि नंतर संभाजी राजे यांनी बंद केली होती. परंतु वतनाना भुलून मराठे सरदार मोगलांच्या छावणीत दाखल होऊ लागल्याचे पाहून राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांनी पूर्वीचा निर्णय बदलला. त्यांनी सरदारांना वतन देण्याची पद्धत पुन्हा सुरू केली आणि मोगल छावणीकडे जाणाऱ्या मराठी सरदारांचा ओघ थंडावला.

सरदारांना वतने देताना या दोघांनी एक शक्कल लढविली. त्यांनी वतने आणि सरंजाम मोगल मुलखात द्यायला सुरुवात केली. म्हणजे वतन, जहांगिर किंवा सरंजाम केवळ कागदोपत्री दिला जाई पण ती घेणाऱ्याला आपला तिथला अधिकार प्रत्यक्ष लढून प्रस्थापित करावा लागे. त्यामुळे मोगल फौजेबरोबरच संघर्ष पेटत राहिला. मोगलांना अनेक ठिकाणे एकाच वेळी लढावे लागत होते. त्यामुळे किल्ल्याभोवतालची मोगलाची पकड ढिली पडू लागली.

पन्हाळा किल्ल्यावर अडकून पडणे धोक्याचे आहे हे लक्षात येताच राजाराम महाराजांनी जिंजीला जाण्याचा बेत पक्का केला. पन्हाळा किल्ल्याभोवतालच्या मुगल वेढ्यातील कमकुवत दुवा हेरून राजाराम महाराज मोजक्या विश्वासू सहकाऱ्यांसह तिथून निसटले. त्यांनी वेष बदलला होता आणि सरळ रस्त्याने न जाता बिनवहिवाटीच्या वाटा पकडून सगळी संकटे पार करून महाराज जिंजीच्या किल्ल्यात सुरक्षित पोहोचले. (इ.स. १६८९)

राजाराम महाराज जिंजीला सुखरूप पोहोचल्याचे वृत्त समजताच मराठी सरदार अधिक आक्रमक झाले. मोगल सैन्यावर अनेक ठिकाणांहून गनिमी पद्धतीचे हल्ले करण्यास त्यांनी सुरुवात केली. मराठे फौज आता आत्मविश्वासाने लढत होती. राजाराम महाराजांचा

जिंजीला जम बसला आणि महाराणी ताराबाई आणि इतर कबिला जिंजीला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रवासाची योजना महाराजांच्या संमतीने रामचंद्रपंतानी ऑक्टोबर १६९४ च्या सुमारास आखली.

त्यावेळी ताराबाई पन्हाळ्यावर होत्या. तिथून त्या विशाळगडावर गेल्या. या दुर्गम पहाडी भागातून कबिला यशवंतगडावर आला. तिथून जैतापूरच्या खाडीवरून समुद्रमार्गे कबिला उत्तर कर्नाटकातील होनावर बंदरापर्यंत पोचला. तिथे विश्वासू सेनादलाने कबिला उतरवून घेतला आणि सुरक्षित बेदरूर राज्यातून बंगरूळ मार्गे कबिला जिंजीपर्यंत पोचला. जिंजीच्या किल्ल्याला मोगलांचा सरदार झुल्फिकारखानाने वेढा घातला होता. पण एक चोरवाट मराठा फौजेला माहीत होती. त्यातून महाराणी ताराबाई आणि इतर कबिला जिंजीला किल्ल्यात सुखरूप पोहोचला.

राजाराम महाराज जिंजीकडे पळाले आहेत असं समजताच मोगल बादशहा औरंगजेबाने आपला सरदार झुल्फिकारखान याला जिंजीकडे रवाना केला होता (जून १६९०). पण जिंजीचा किल्ला विस्तीर्ण आणि बळकट होता. झुल्फिकारखानाकडे वेढा घालण्यासाठी पुरेसे सैन्यदळ नव्हते. शिवाय किल्ल्याच्या मजबूत दगडी भिंतीना भेदणारा सक्षम तोफखानाही नव्हता. तेव्हा तोडकामोडका वेढा घालून खान जिंजीच्या किल्ल्याभोवती बसला होता.

सुमारे एक वर्षानंतर बादशहाकडून कुमक आली पण त्यामुळे मोगली वेढ्याची स्थिती सुधारली नाही. उलट बादशहाने आपल्याला डावलले असं झुल्फिकारखानाला वाटले. वेढ्यात अपेक्षित जोर नव्हता. कारणे होती अतिवृष्टी आणि अन्नधान्याचे दुर्भिक्ष याचे. दोन्ही कारणांनी मोगल सैना वैतागली होती. त्यात पिछाडीच्या बाजूने मराठे फौज हल्ले करून मोगल सेनेला त्रस्त करीत होती.

जिंजी किल्ल्याभोवतीचा वेढा दोन्ही बाजूनी फारसे नुकसान न होता चालू राहिला होता. विचार करताना ताराबाईंच्या असे लक्षात आलं की, मराठ्यांच्या विरुद्धची ही मोहीम निकालात काढणे मोगल सेनाधिकाऱ्यांना नको होतं. ते त्यांच्या स्वार्थाच्या विरोधात जाणारे होते. मोहीम संपली तर आपण बेरोजगार होऊ अशी त्यांना धास्ती वाटत होती. अशीही एक शंका होती की झुल्फिकारखान आणि राजाराम महाराज यांचे एकमेकांशी गुप्त संगनमत होते म्हणून त्यांनी मोगल सेनेला जिंजीभोवतीचा वेढा उठवून वांदिदाराकडे सुरक्षित जाण्यासाठी मार्ग दिला आणि झुल्फिकारखान त्याच्याकडून जिंजीवरील हल्ल्यात जमेल तेवढी कुचराई करीत होता.

जिंजीच्या किल्ल्यावरील वास्तव्यात राजाराम-ताराबाई या राज दाम्पत्याला पुत्र लाभ झाला (जून १६९५). महाराणीने या राजकुमाराचे नाव शिवाजी ठेवले. हा पुत्र आपल्या आजोबांसारखा शूरवीर आणि राजकारण धुरंधर होईल अशी त्यांची अपेक्षा होती. नाव ठेवण्यामागे हा विचार होता.

संभाजी राजांच्या वधानंतर तीन प्रमुख सत्ता केंद्र निर्माण झाली होती. राजमंडळाचा रायगड केंद्रित उत्तर भाग आणि सातारा केंद्रित दक्षिण भाग असे दोन भाग होते. हे राजमंडळाचे दोन विभाग आणि तंजावरचे प्रधान मंडळ मिळून तीन सत्ता केंद्र राजाराम महाराजांच्या शासन काळात निर्माण झाली होती. संभाजी महाराजांनंतर पहिली चार वर्षे व्यवस्थित गेली. ताराबाई रामचंद्र पंताबरोबर राज्य व्यवस्था आणि युद्ध प्रयत्न यात सहभागी असे. प्रल्हाद निरजी जिंजीहून राजाराम महाराजांचा प्रतिनिधी म्हणून त्यांच्या नावे फर्मान काढीत असे. सर्वांचे एकमेकांशी जुळत होते. त्यामुळे शासकीय वा राजकीय तिढा निर्माण झाला नव्हता. संताजी आणि धनाजी यांची जोडीसुद्धा मोगल सैन्याला धडकी भरवित होती.

महाराणी ताराबाई जिंजीला पोचल्यानंतर ही स्थिती पालटली. महाराणी स्वतः राजकारण निपुण आणि लष्करी हालचालींच्या जाणकार होत्या. महाराणींचे विचार रामचंद्रपंताशी जुळणारे होते. त्यामुळे जिंजीच्या दरबारातील प्रल्हाद निरजी यांचे महत्त्व कमी झाले. राजाराम महाराज आता ताराबाईंच्या सल्ल्याने काम करू लागले होते. रामचंद्रपंत आणि ताराबाई एकमेकांवर कुरघोडी करू पहात होते. दोघांनाही मराठी राज्यावर आपली पकड बसवायची होती. रामचंद्रपंताना सर्वाधिकारी पंतप्रधान तर ताराबाईंना सर्व शासक महाराणी बनायचे होते.

दरम्यान संताजी घोरपडे रणांगणावरील पराक्रमाने चढेल झाले. महाराजांची आज्ञा झुगारण्यापर्यंत त्यांची मजल गेली. शेवटी महाराजांनी धनाजी जाधव यास संताजी घोरपड्यांना पकडण्याची आज्ञा केली. त्यांच्यामध्ये तीन लढाया होऊन संताजी पराभूत झाला. संताजी थोड्या अनुयायांसह साताऱ्याच्या महादेव डोंगरात जाऊन लपला. शेवटी त्याच्यावर मारेकरी घालून त्याला ठार करण्यात आले.

संताजी घोरपडे यांच्या मरणाने मराठा फौज एका पराक्रमी सेनापतीला मुकली. बादशहाकडे हे वृत्त येताच त्याला अत्यानंद झाला. बादशहाला राजाराम महाराजांना पकडण्याची घाई झाली होती. संताजीच्या वधानंतर मराठ्यांबरोबरचे युद्ध लवकरात लवकर संपविण्याची निकडही बादशहाला वाटू लागली. त्याने निर्वाणीचे फर्मान झुल्फिकारखान याला दिले.

राजाराम महाराज आणि मोगल सरदार झुल्फिकारखान यांचे अंतर्गत सूत जमले होते. म्हणून त्याने राजांना जिंजी सोडून जाण्याचा सल्ला दिला. संताजीच्या वधानंतर राजाराम राजांनाही हे अपेक्षित होते. झुल्फिकारखानाच्या मदतीने जिंजीच्या किल्ल्यातून राजाराम महाराज मोजक्या सहकाऱ्यांसह बाहेर पडले आणि वेल्लोरच्या

किल्ल्यावर जाऊन मराठा फौजेला मिळाले. महाराजांचा कबिला म्हणजे महाराणी ताराबाई, राजसबाई, सगुणाबाई आणि बालराजे शिवाजी जिंजीस मागे राहिले होते. हा कबिला मोगल लष्करात असलेल्या गणोजी शिर्के यांच्या मदतीने जिंजीच्या किल्ल्यातून बाहेर पडून सुखरूपपणे वेल्लोरला पोहोचला.

राजाराम महाराज आणि त्यांचा राजपरिवार जिंजीच्या किल्ल्यातून सुरक्षितपणे बाहेर पडल्यानंतर मोगल सेनेने जिंजीचा किल्ला काबीज केला.

मात्र मोगल बादशहाला हवा असलेला मराठ्यांचा राजा काही त्याच्या हाती लागला नव्हता. बादशहा निराश झाला.

■

३. राजाराम महाराजांचे निधन

वेल्लोरच्या किल्ल्यात राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई फार दिवस राहिले नाहीत. तिथे अधिक थांबणे धोक्याचे होते. जिंजी जिंकून घेतल्यानंतर राजांच्या मागावर मोगल फौज वेल्लोरकडे येण्याची शक्यता होती. तेव्हा महाराष्ट्रातून राजांना घेऊन जाण्यासाठी संरक्षक घोडदळे मागविण्यात आली. ती येताच कबिल्यासह राजाराम महाराज त्वरेने पन्हाळा किल्ल्याकडे निघाले. भुदरगडावर विश्रांतीसाठी थांबले. पन्हाळगड आता जवळ आला होता. स्वराज्यात आल्यामुळे आता त्यांना खूप सुरक्षित वाटत होते.

हा प्रवास करताना महाराजांनी आपल्या लव्याजम्यासह बरीच मजल मारली होती. महाराणी ताराबाई महाराजांबरोबर घोड्यावर प्रवास करीत होत्या. बाकी राणीवसा मेण्यांमधून येत होता.

भुदरगडाहून राजाराम महाराज आपल्या कबिल्यासह पन्हाळगडावर पोहोचले (मार्च १६९८).

रात्रीच्या विश्रांतीनंतर सकाळी गडावर फेरफटका मारताना ताराबाई महाराजांना म्हणाल्या, 'जिंजीच्या वेढ्यातून आपण सहीसलामत

सुटल्यामुळे औरंगजेब बादशहा चांगला चिंताग्रस्त झाला असणार. आता तो वेगळी चाल खेळेल, आपण त्याला तयार रहायला हवे.'

ताराबाईंनी पुढे सुचवले, 'आजच प्रमुख राजकारण्यांची, मुलकी अधिकाऱ्यांची आणि सेनानायकांची बैठक आपण घ्यावी. पुढची चाल आपल्याला निश्चित करायला हवी.'

महाराज म्हणाले, 'राणीसाहेब आपली सूचना योग्य आहे. लगेच बैठक बोलावतो.'

त्याप्रमाणे दुपारनंतर मान्यवर मंडळींची बैठक बोलावली गेली. बैठकीला रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, खंडो बल्लाळ इत्यादी मुलकी अधिकारी आणि धनाजी जाधव हे सरसेनापती व त्यांचे इतर सेनानायक उपस्थित होते. बैठकीत सर्वांनी मते मांडली. मोगल राज्याचा डोलारा भ्रष्टाचाराने पोखरून गेलेला आहे तेव्हा मोगल सरदारांचा तसेच शहाजाद्यांच्या व्यक्तिगत स्वार्थाचा आपण आपली लढाई जिंकण्यासाठी फायदा करून घ्यावा, असे एकमताने ठरले.

महाराणी ताराबाई यांनी यावेळी काही सूचना केल्या. त्या म्हणाल्या, 'मराठ्यांची ताकद आपले गड व किल्ले यांच्यात आहे. गनिमी काव्याच्या लढाईत तेच आम्हाला साथ देतात. बादशहाला हे चांगले माहीत आहे. तेव्हा तो आपल्या मजबूत किल्ल्यांवर हल्ले चढवेल आणि दुसरीकडे मोगल सेनेच्या पिछाडीवरून हल्ला करणाऱ्या आमच्या फौजांना मैदानावर अडवेल. तेव्हा आपण तातडीने सर्व किल्ल्यांची पाहणी करणे गरजेचे आहे.'

उपस्थित सर्वांना महाराणीचं बोलणं पटलं. राजाराम महाराज प्रथम उत्तर कोकणातील मराठी प्रदेश आणि त्यातील महत्त्वाचे किल्ले यांच्या पाहणीला निघाले. बरोबर महाराणी ताराबाई आणि राणी सारसबाई होत्या. प्रथम विशालगड पाहिला. त्यानंतर सिंधुदुर्ग तसेच सागरी पट्टीवरील विजय दुर्ग, रत्न दुर्ग, भगवती आणि शेवटी वर

उत्तरेस अलिबागच्या किल्ल्यापर्यंत समुद्री किल्ल्यांची पाहणी केली. मोगल रसद सागरीमार्गे येणार नाही याचा चोख बंदोबस्त महाराजांनी केला. आंग्रे स्वतः जातीने महाराजांबरोबर सागरी किल्ल्यांवर फिरले. रायगड किल्ला मोगलांच्या ताब्यात होता. मात्र रायगड- भोवतालचा राजगड आणि तोरणा किल्ल्यांना महाराजांनी भेटी दिल्या आणि तेथील शिबंदीना प्रोत्साहित केले.

ही पाहणी संपविताना महाराज प्रतापगडावर थांबले आणि महाराणी ताराबाई, राजपुत्र शिवाजी यांच्यासह भवानी देवीचे दर्शन घेतले.

महाराज प्रतापगडावर असतानाच विशालगडावरून राजसबाईंना पुत्र झाल्याची बातमी आली. तेव्हा ताराबाई आणि पुत्र शिवाजी यांना सज्जनगडावर पाठवून महाराज विशालगडावर गेले. तिथे आपल्या नव्या पुत्राचे दर्शन घेतले आणि त्याचे नाव ठेवले संभाजी.

आता जिंजी मोगलांच्या ताब्यात गेली होती. अमात्य रामचंद्रपंत विशालगडावरून कारभार पाहत होते. पण विशालगड राज्यकारभाराच्या दृष्टीने सोयीचा नव्हता. सातारा हे मध्यवर्ती ठिकाण होते म्हणून राजाराम महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या राजधानीसाठी साताऱ्याची निवड केली आणि इ.स. १६९८ च्या उत्तरार्धात सातारा राजधानी घोषित झाली.

पुढील वर्षाच्या सुरुवातीला राजाराम महाराज स्वतः तुंगभद्रा नदीच्या उत्तर भागातील मोगली प्रदेशावर चाल करून गेले. हुबळी, धारवाड, सादनूर, शिमोग अशी सधन ठिकाणे मराठी फौजेने लुटली. बादशहाच्या फौजांना गोंधळात टाकण्याचा हा प्रयत्न यशस्वी होत होता.

राजाराम महाराज मोहिमेवरून परत आले आणि विशालगडावर गेले. तिथे त्यांना भेटायला सज्जनगडावरून महाराणी ताराबाई छोट्या शिवाजीसह आल्या. त्यावेळी त्या गरोदर होत्या. विशालगडावरच

त्या प्रसूत होऊन त्यांना मुलगी झाली. वसंतु ऋतुचे ते दिवस होते (मार्च १६९९). मुलीचे बारसे करून तिचे नाव अंबिका ठेवण्यात आले.

इ.स. १६९९ चा वर्षाकाळ संपल्यानंतर मोगल बादशहा जातीने मराठ्यांचे किल्ले जिकून घेण्याची मोहीम हाती घेत आहे अशी बातमी येऊन पोचली. महाराज त्यावेळी साताऱ्याला होते. बादशहा प्रथम साताऱ्याला वेढा घालील अशी त्यांची अटकळ होती. तेव्हा मोगलांच्या साताऱ्यावरील संभाव्य चालीचा जोर कमी करण्यासाठी राजाराम महाराजांनी एक बेत पक्का केला. राजांनी मोगलांच्या खानदेश आणि वऱ्हाड भागात तेज घोडदळाने आघात करून धामधूम उडवून देण्याचे ठरविले. या मोहीमेचे नेतृत्व त्यांनी स्वतःकडे घेतले. महाराणी ताराबाई आणि मुले यांना सुरक्षित अशा विशालगडावर हलविण्यात आले.

चंदन-वंदन किल्ल्यावरून प्रयाण करून राजाराम महाराज उत्तरेकडे खानदेश आणि वऱ्हाड या मोगल मुलखात मोठे सैन्य घेऊन शिरले. महाराजांच्या बरोबर खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले, हैबतराव निंबाळकर ही सरदारांची तरुण पिढी धनाजी जाधव यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली घौडदौड करीत त्या मुलखात थैमान घालू लागली. सुरतेकडे हल्ला करतो असे भासवून अचानक खानदेशाकडे मराठी फौज वळत होती आणि मोगलाना चकवा देत होती.

मराठ्यांच्या या मोहिमेची खबर मिळताच बादशहाने झुल्फिकारखानाच्या नेतृत्वाखाली त्वरेने मोठे सैन्य मराठ्यांना रोखण्यासाठी पाठवले. मोगलांकडे मोठी फौज व प्रचंड दारूगोळा होता. झुल्फिकारखानापुढे मराठ्यांचे फारसे काही चालले नाही. त्याने मराठ्यांना अहमदनगरपर्यंत मागे खेचत आणले.

आता मोगल सैन्याने साताऱ्याला वेढा घातला होता. खानदेश, वऱ्हाड मोहीम अर्धवट सोडून मराठी फौजा साताऱ्याकडे आल्या.

वेढा घालून बसलेल्या मोगल सैन्यावर पाठीमागून हल्ले करू लागल्या. (नोव्हेंबर १६९९).

मराठी सैन्याच्या तुकड्या इतरत्र सुद्धा धुमाकूळ घालीत होत्या. मराठ्यांनी बऱ्हाणपूर लुटले. याचवेळी दक्षिणेकडे हुबळीजवळ हिंदुराव घोरपड्यांनी धामधूम उडवून दिली होती. मराठे-मोगल संघर्ष असा तीव्र झाला होता.

मात्र या सर्व मोहीमांचा ताण महाराजांच्या प्रकृतीवर पडू लागला होता. त्यांना श्वसनाचा त्रास होता. आता फुफ्फुसे काम करेनाशी झाली. संघर्षापासून थोडी विश्रांती मिळावी म्हणून राजाराम महाराज सिंहगडावर येऊन राहिले.

वैद्यकीय इलाज चालू होते पण महाराजांची प्रकृती खालावत चालली होती.

राजसबाई आणि ताराबाई आपल्या मुलांसह सिंहगडावर येऊन पोचल्या. रामचंद्रपंत सुद्धा मोगलांबरोबरच्या संघर्षातून सवड काढून सिंहगडावर भेटीस आले.

राजाराम महाराज मृत्यूशय्येवर शेवटचे श्वास घेत होते. ते बळ एकवटून सर्वांकडे पाहून म्हणाले, 'शाहूला वाचवा.'

मग पुन्हा उसंत घेऊन तीनदा म्हणाले, 'स्वराज्य राखा.'

स्वराज्याच्या रक्षणाच्या ध्यासात राजाराम महाराजांचा श्वास विरून गेला, ती तारीख होती २ मार्च १७००.

राजाराम महाराजांच्या मृत्यूची बातमी मोगलाच्या छावणीत पोहोचली. बादशहाला आनंद झाला.

राजारामाच्या मागे त्याच्या बायका आणि अजाण मुले युद्ध काय लढविणार असे त्याला वाटले पण नियती त्याला हसत होती.

महाराणी ताराबाई त्याच्यापुढे कुठले आव्हान उभे करणार होती, याची त्याला कल्पना नव्हती!

■

४. राज्यकारभाराची सूत्रे ताराबाईंकडे

राजाराम महाराजांच्या मृत्यूने महाराणी ताराबाई वयाच्या पंचविसाव्या वर्षी विधवा झाल्या होत्या. त्यावेळी त्यांचा पुत्र शिवाजी जेमतेम चार वर्षांचा होता आणि मुलगी अंबिका एक वर्षाची. पण राजाराम महाराजांच्या निधनाचे सर्व दुःख बाजूला ठेवून महाराणी ताराबाईंना युद्ध प्रयत्न आणि राजकारण याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक होते. कारणे दोन होती. औरंगजेबाच्या रूपाने मोठे संकट हिंदवी स्वराज्यावर येऊन कोसळलेले होते, त्याला हिंमतीने तोंड देणे आवश्यक होते. आणि दुसरे राज्याच्या कारभाराची घडी बसवणे आवश्यक होते. नाहीतर राज्यात बेदिली माजण्यास वेळ लागला नसता.

धुळीला मिळू पाहणारे स्वराज्य पुन्हा तरारून उठवण्यासाठी ताराबाईंकडे काही योजना होती. मात्र अमात्य रामचंद्रपंत यांच्या मनात काही वेगळे होते. त्यांच्या मते, संभाजीराजाचे पुत्र शाहू राजे जे त्यावेळी बादशहाच्या कैदेत होते, त्यांचा गादीवर वारसा हक्क आहे. त्यामुळे राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर शाहूचा राजगादीवरील हक्क

मान्य करूनच त्यांना स्वातंत्र्ययुद्ध पुढे चालू ठेवावयाचे होते. महाराणी ताराबाईंना ही योजना पसंत नव्हती. त्यांना वाटत होते, त्यांचा पुत्र बालशिवाजीला गादीवर बसवावे आणि अज्ञान छत्रपतीची पालनकर्ते म्हणून स्वतः अधिकार चालवावा. असे केले तरच महाराणींना युद्धाची धुरा समर्थपणे सांभाळता येणार होती आणि औरंगजेबाच्या कूट नीतिच्या हल्ल्याला यशस्वीरीत्या तोंड देता येणे शक्य होणार होते.

मराठी राज्य बिकट संकटात सापडल्याचे पाहून काही स्वकीयांनी या परिस्थितीचा फायदा उठविण्याचे ठरविले यात नवल नव्हते. लष्करातील काही अधिकाऱ्यांनी शाहू महाराजांचे तोतयेही निर्माण केले. या नव्या संकटांनी खुद्द प्रधानमंडळात फूट पडण्याचा धोका निर्माण झाला. सत्तेपासून दूर राहून युद्धप्रयत्नांना नीट चालना देता येणार नाही हे ताराबाईंच्या लक्षात आले. ताराबाईंनी तोतयाची ही बंडे लगेच मोडून काढली आणि प्रधानमंडळातील फूट मोठ्या संयमाने सांधून टाकली. अधिक वेळ न दवडता ताराबाईंनी सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. शंकराजी नारायण आणि इतर राजकारण्यांना हे लगेच

पटले. अमात्य रामचंद्र, सरसेनापती धनाजी जाधव वगैरे काही मंडळींना महाराणींची सत्ता मान्य करायला थोडा वेळ लागला. पण लवकरच सर्व राजकारणी व सेनानी यांचे एकमत झाले.

महाराणी ताराबाई यांच्या ठिकाणी असामान्य मनोनिग्रह, संयम, हुशारी आणि स्वातंत्र प्रेम हे गुण ओतप्रोत होते. त्या जोरावर त्यांनी त्यांच्या समोरच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात केली आणि मराठी राज्य बुडविण्याच्या निर्धाराने मोहिमेवर निघालेल्या औरंगजेबाशी सामना करावयास त्या सज्ज झाल्या.

राजाराम महाराजांच्या मृत्यूसमयी औरंगजेब बादशहा साताऱ्याला वेढा घालून बसला होता. या वेढ्यात मोगलांच्या लष्करात खुद्द बादशहाशिवाय, शहजादा आज्जम, तरबियतखान, रुहुल्लाखान इत्यादी सेनानी होते. मोगलांजवळ प्रचंड दारुगोळा आणि मनुष्यबळ होते. तोफखान्याचा प्रमुख तरबियतखान याने किल्ल्यावर तोफा डागण्यासाठी एक मोठा लाकडी मनोरा तयार केला. तथापी या व्यवस्थेचा किल्ल्यावर काही परिणाम झाला नाही. तेव्हा किल्ल्याच्या तटाखाली दोन मोठे सुरुंग पेटवण्यात आले. या सुरुंगाच्या स्फोटाने मराठ्यांची मनुष्यहानी फारशी झाली नाही पण मोगलांचे हजारो सैनिक मात्र मृत्यूमुखी पडले. अशा परिस्थितीत पुढे वेढा चालू ठेवणे आवश्यक होते. मात्र मोगलांची फौज चिंताग्रस्त झाली होती.

दरम्यानच्या काळात मराठ्यांनी सर्वत्र धुमाकूळ घातला होता. मोगली ठाण्यांवर छापे घालणे, अधिकाऱ्यांना कैद करणे, रसदा मारणे, छावण्यांवर हल्ला करणे या प्रकारांनी मराठ्यांच्या सैन्याने मोगलांना हैराण करून सोडले होते. इतिहासकार सर यदुनाथ सरकार यांच्या मते तर किल्ल्याला संपूर्णपणे वेढा घालणेही मोगलांना साधले नाही. शेवटपर्यंत मराठे किल्ल्यातून कधीही बाहेर पडू शकत आणि बाहेरून आत जात. तुरुंगाच्या स्फोटांनी सातारच्या किल्ल्याची तटबंदीही बरीच

पडली होती तेव्हा किल्ल्याला फार दिवस लढविणे अशक्य आहे हे लक्षात येताच मराठ्यांनी हा किल्ला बादशहाच्या हवाली केला. त्यासाठी बादशहाला मराठ्यांशी वाटाघाटी कराव्या लागल्या आणि किल्ल्यांवरील लोकांना अभय द्यावे लागले.

सातार्‍याचा किल्ला जिंकल्यानंतर बादशहाने परळीच्या किल्ल्याकडे कूच करण्याचा हुकूम आपल्या सैन्याला दिला. हा किल्ला सातार्‍याचा पश्चिमेला सुमारे वीस कोस अंतरावर होता. बादशहाच्या हुकूमाप्रमाणे फत्तेउल्लाखान सैन्याची एक तुकडी घेऊन परळीच्या किल्ल्याकडे रवाना झाला. त्याचा मागोमाग वेढ्यासाठी आणि तोफांचे मनोरे रचण्यासाठी जरूर असणारी सामग्री त्वरेने पाठवण्यात आली. लगेच स्वतः बादशहा मोठी फौज आणि तोफखाना घेऊन निघाला. परळीला येऊन गडाच्या पायथ्याला असलेल्या मैदानावर त्याने आपली छावणी टाकली.

मराठ्यांचे सैनिक शर्थीनं किल्ला लढवित होते. पावसाचा जोर वाढला आणि मोगल फौज हवालदिल झाली. रशिदीच्या अभावी सैन्याचे हाल होऊ लागले, घोडे मरू लागले. मराठ्यांची पथके रात्री बेरात्री किल्ल्यावरून गुपचूप उतरत आणि झोपलेल्या मोगल सैनिकांना मारून पसार होत. वेढ्यांच्या बाहेरून सुद्धा मराठे अचानक हल्ला करीत आणि बेसावध सैनिकांना गारद करून जात. अशाप्रकारे मराठे शर्थीनं लढून मोगल सैनिकांचे किल्ल्यावरील हल्ले नाकाम करीत होते.

अशा बिकट परिस्थितीत हल्ला करून किल्ला जिंकायला फार कठीण जाणार आहे, याची खात्री मोगलांना झाली. अवेळी आलेल्या पावसाने जर आपले इतके नुकसान झाले आहे, तर नियमित पावसाळा सुरू झाल्यावर काय स्थिती होईल याची धास्ती मोगल सैन्याला वाटली. तेव्हा वाटाघाटी करून किल्ला मिळवायचा असा विचार

मोगल सेनापतींनी केला. या बाबतीत शहाजादा आझ्झमने पुढाकार घेतला. या वाटाघाटींना यश येऊन मराठ्यांना सुरक्षित वाट देऊन आणि योग्य खंडणी या दोन अटींवर किल्ला मोगलांच्या ताब्यात देण्याचे कबूल करण्यात आले.

महाराणी ताराबाईंच्या युद्धनीतीचा हा कावा होता. मोगलांबरोबर जास्तीतजास्त काळ किल्ला लढवायचा, किल्ला लढविणे सैनिकी आणि आर्थिकदृष्ट्या कठीण झाले की, मोगलांकडून भरपूर पैसा घेऊन किल्ला त्यांना खाली करून द्यायचा. मोगल पण मोठ्या आनंदाने किल्ला घेऊन त्यात अन्नधान्य व दारूगोळा यांची बेगमी करून ठेवायचे. त्यांना असे केले की, योग्य संधी साधून मराठे मोगलांकडून किल्ला पुन्हा ताब्यात घ्यायचे.

परळीच्या किल्ल्याच्या बाबतीत मराठ्यांनी याच पद्धतीचा अवलंब केला आणि किल्ला मोगलांच्या ताब्यात दिला. या किल्ल्यावरील हिंदु देवालये मोगल सेनेनी पाडून टाकली आणि किल्ल्याचे नाव 'नवरस तारा' असे ठेवले.

■

५. ताराबाईंची चौफेर भरारी

सातार्‍याचा किल्ला आणि परळीचा सज्जनगड किल्ला जिंकल्यानंतर बादशहा औरंगजेबाने आपला मोर्चा पन्हाळगडाकडे वळवला. मराठ्यांना बादशहाच्या या संभाव्य हल्ल्याची बातमी मिळाली आणि या हल्ल्याला तोंड देण्याची त्यांनी चांगली तयारी केली. कणखर शिबंदी युद्धाची तयारी ठेवून त्याचा नायक म्हणून ताराबाईंनी विठोबा केसरकर हा शूर लढवय्या नियुक्त केला. या शिवाय महाराणी ताराबाई स्वतःच्या बोलण्याने तसेच लिहिण्याने आपल्या सेनादलाला शत्रूला प्रखर प्रतिकार करण्यासाठी प्रोत्साहित करीत होती. पन्हाळगडाच्या किल्लेदारांना महाराणीने स्वतः पत्र लिहिले आणि त्यात औरंगजेबला हिसाब न धरता त्याला जोरदार ठेचा द्यावा असे सांगितले आणि त्याच्या या कामाचे बक्षिस छत्रपतीकडून मिळेल असे आश्वासनसुद्धा दिले.

याचवेळी महाराणी ताराबाईंच्या हुकमावरून धनाजी जाधव, अणोजी घोरपडे, निंबाळकर इत्यादी मराठी सेनानी मोगली मुलखात आणि बादशाही छावणीच्या आसपास मोठी धामधूम माजवीत होते.

त्यांच्या पाठलाग करण्यासाठी बादशहाला झुल्फिकारखान, फिरोजजंग यासारखे सरदार वारंवार पाठवावे लागत होते. अशाप्रकारे अनेक ठिकाणी मराठे आणि मोगल यांच्या पाठशिवणीच्या लढाया चालू होत्या. पन्हाळ्याचा किल्ला जिंकणे मोगलांना अशक्य वाटत होते. खुद्द मोगलांच्या सैन्यामध्ये दुही माजली होती. तेव्हा मोगलानीच ताराबाईंशी वाटाघाटी सुरू केल्या आणि ताराबाईंनी बादशहाकडून ५५ हजार रुपये घेऊन पन्हाळ्याचा किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. (२८ मे १७०२).

पन्हाळगड काबीज केल्यानंतर बादशहाने आपली छावणी विशाळगडाकडे वळवली. इथल्या वेढ्याची कामगिरी फत्तेउल्लाखान या सेनानीकडे होती. त्याने प्रामाणिकपणे आणि शर्थीने मराठ्यावर हल्ले चढवले. परंतु किल्ल्यावरील मराठे फौजा तयारीत होत्या. त्यामुळे हे हल्ले त्यांनी तेवढ्याच पराक्रमाने मोडून काढले. या किल्ल्याविषयी मोगल सरदार साकी मुस्तेदखानचे उद्‌गार महत्त्वाचे होते. तो म्हणाला, ‘विशाळगड किल्ला म्हणजे मूर्तिमंत संकटे व कष्ट. तो घेण्याची

कल्पना जरी केली तरी प्राण कासावीस होतात.'

वेढा सुरू होऊन चार महिने होऊन गेले तरी मराठे शरण आले नव्हते. पावसाळा जवळ आला होता आणि पावसाळ्यापूर्वी जर किल्ला हाती आला नाही तर त्या भयंकर प्रदेशातून व पावसाच्या तडाख्यातून मोगली लष्कर वाचणे कठीण होते. शेवटी आपली इभ्रत राखण्यासाठी बादशहाला हाही किल्ला वाटाघाटी करून व दोन लाख रुपये देऊन ताराबाबाईंकडून विकत घ्यावा लागला. (७ जून १७०२).

या दोन्ही किल्ल्यांच्या वेढ्यात मोगलांच्या लष्कराचा अकार्यक्षमपणा आणि त्यांच्या सरदारांमधील हेवेदावे स्पष्ट दिसून आले होते.

पन्हाळगड आणि विशाळगड या दोन्ही किल्ल्यांच्या वेढ्यांच्यावेळी महाराणी ताराबाईंचे युद्धप्रयत्न प्रकर्षाने चालू होते. मराठी सरदारांना स्वराज्यप्रेमाचे आवाहन त्या पत्रांमधून करीत होत्या. तसेच औरंगजेबाला ठेचगा देण्याची आणि त्याचा हिसाब पूर्ण करण्याची भाषा ताराबाईंनी त्या पत्रांमधून वापरली होती. त्यांच्या या भावनात्मक आवाहनाचा लष्कराच्या नीतिधैर्यावर आणि मानसिकतेवर चांगला परिणाम घडत होता. पन्हाळगड आणि विशाळगडावरील युदध प्रयत्नात आणखी एक गोष्ट प्रकर्षाने दिसून आली आणि ती म्हणजे मराठे फौजांचा गनिमी कावा. या हल्ल्याने ते मोगल फौजांना हैराण करीत होते. बादशहाच्या छावणीकडे येणाऱ्या रसदी सर्रास लुटत होते. त्यामुळे मोगल फौजांना अनेकवेळा उपासमारीचा सामना करावा लागत होता.

सह्याद्रीच्या बिकट प्रदेशात आपल्या फौजा घुसवून मराठ्यांचे डोंगरी किल्ले आपण सहज जिंकू असे बादशहाला वाटले होते. परंतु त्यात बराच कालावधी जात होता आणि ताराबाईंना आपले सरदार सैन्यासह बादशाही मुलखात घुसविण्यास वेळ मिळत होता. सन १७०२ पासून मराठ्यांनी मोगली साम्राज्यावर आक्रमक पवित्रा घेऊन त्यांनी

जिंकलेल्या मुलखात आपल्या फौजेचा हल्ला करण्यास प्रारंभ केला.

धोरणाप्रमाणे आणि ताराबाईंच्या आदेशाप्रमाणे गुजरात, माळवा, खानदेश, आंध्र, कर्नाटक, मद्रास इत्यादी प्रदेशात मराठी फौजांनी आक्रमण करून धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. त्यामुळे दक्षिणेतील सर्व सुभ्यात आणि उत्तरेकडील माळवा व गुजरात यासारख्या संपन्न सुभ्यात अराजक सदृश्य परिस्थिती झाली. तेथील मोगली व्यवस्था खिळखिळी व्हावयास प्रारंभ झाला. आता बादशहापुढे मोठी समस्या निर्माण झाली. कारण दक्षिणेकडील प्रदेश हातातून निसटत चालला होता. त्यामुळे उत्तरेकडील साम्राज्याचे संरक्षण कसे करावे हा बिकट प्रश्न त्याच्यापुढे निर्माण झाला.

ताराबाईंच्या फौजांनी बुऱ्हाणपूर गोवळकोंडा यासारखी मोगली शहरे लुटली होती. त्यामुळे मोगली साम्राज्यातील व्यापार पार रसातळाला गेला. दक्षिणेकडील प्रत्येक परगण्यात, खेड्यात मराठे हे टोळ मुंग्यासारखे पसरले होते असे चित्र होते. सर्व सधन शहरे धुवून निघाली आणि सर्वत्र बेबंदशाही माजली होती. मद्रास येथील इंग्रज गव्हर्नर याने फेब्रुवारी १७०२ च्या पत्रात काढलेले उद्‌गार सार्थ होते व वस्तुस्थितीला धरून होते. तो म्हणतो, आता हिंदुस्थानात अभूतपूर्व बेबंदशाही चालू आहे.

या सगळ्याला कारण घडले महाराणी ताराबाईंचे समयसूचक धोरण. मोगल बादशहा जेव्हा मराठ्यांच्या स्वराज्यातील किल्ले घेण्याच्या प्रयत्नात गुंतला जायचा तेव्हा त्याच्या साम्राज्याच्या इतर सुभ्यांवर स्वाऱ्या करून त्या यशस्वी पार पाडण्याचे धोरण ताराबाई अत्यंत मुत्सद्दीगिरीने आखत होती. त्याचबरोबर स्वराज्यातील किल्ल्यासंबंधीचे ताराबाईंनी योजलेले धोरणसुद्धा शहाणपणाचे होते. मोगल बादशहा औरंगजेब हा दसरा संपल्यानंतर (ऑक्टोबर-नोव्हेंबर) मोहीमेवर निघत असे. त्याचे सैन्य ज्या किल्ल्याला वेढा घालत असे

तो किल्ला मोठ्या शर्थीने सहा-सात महिने तरी लढवायचा आणि शेवटी पावसाळा तोंडावर आला की भरपूर पैसे घेऊन तो त्याला देऊन टाकायचा हे ताराबाईंचे धोरण खूप शहाणपणाचे ठरले होते. कारण त्यामुळे बादशहाला वर्षातून एकच किल्ला मिळावा आणि तोही पैसे मोजून त्याने घ्यावा असे या तिच्या धोरणामागचे सूत्र होते. त्यामुळे एक किल्ला घ्यायला एक वर्ष म्हणजे पाच-सहा किल्ले घेण्यातच बादशहाचे राहिलेले आयुष्य संपून जाईल असे ताराबाईला खात्रीपूर्वक वाटत होते आणि हे खरेही होते, कारण बादशहा आता म्हातारा झाला होता आणि आयुष्याच्या शेवटाकडे तो वाटचाल करीत होता.

अशाप्रकारे मराठी राज्याची सूत्रे घेतल्यानंतर एक-दोन वर्षातच ताराबाईंनी आक्रमक धोरण स्वीकारले होते आणि मोगली फौजेवर बचावात्मक पवित्रा घेऊन लढाया करण्याची पाळी आली होती.

इ.स. १७०२च्या शेवटी बादशहाने आपल्या फौजेसह सिंहगडावर स्वारी केली आणि या किल्ल्याला वेढा घातला. हा वेढा जवळपास तीन महिने पडला होता. मराठे फौज मोगलांना दाद देत नव्हती. हा किल्ला जिंकून घेणे अवघड आहे हे लक्षात आल्यावर शेवटी बादशहाच्या तरबियतखान या सरदाराने मराठ्यांना ५० हजार रुपये दिले आणि तो किल्ला ताब्यात घेतला. मात्र सिंहगडाचा वेढा चालू असताना मराठे गप्प नव्हते. त्यांच्या फौजांनी बऱ्हाणपूर लुटून माळव्यावर चाल केली होती. त्याचवेळी मराठ्यांच्या आणखी काही फौजा गुजरात, बागलाण, वऱ्हाड इत्यादी प्रदेशात धुमाकूळ घालून प्रदेश लुटीत होत्या. मोगलांच्या फौजा मराठ्यांच्या मागे धावण्याचे फक्त निष्फळ काम करीत होत्या.

सिंहगड जिंकल्यानंतर बादशहाने आपली छावणी पुण्याला हलवली. (इ.स. १७०३). याच काळात महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ

पडला. अक्षरशः हजारो माणसे अन्नावाचून तर जनावरे चाऱ्यावाचून तडफडून मेली. दुष्काळाच्या या भयंकर दिवसातही निर्दयी बादशहाने आपली मोहीम थांबवली नाही. मोगलांची फौज राजगड या किल्ल्यावर चढाई करून गेली आणि त्या किल्ल्याला वेढा घातला. सतत दोन महिने मोगलांचे सैन्य या किल्ल्यावर तोफांचा मारा करीत होते. शेवटी किल्ल्याच्या बाहेरचा तट मोगल सैन्य काबीज करण्यात यशस्वी झाले. अशा स्थितीत मराठ्यांनी राजगडचा बालेकिल्ला दहा दिवस शर्थीने लढविला. विशेष म्हणजे हा बालेकिल्ला मोगलांच्या ताब्यात सहज काही आला नाही. त्यांना तो मराठ्यांना द्रव्य देऊनच ताब्यात घ्यावा लागला (१७०४). राजगडानंतर मोगलांची नजर तोरणा किल्ल्याकडे वळली आणि या किल्ल्याला त्यांनी वेढा घातला. हा किल्ला मोगलांनी हल्ला करून जिंकला. मोगलांनी मराठ्यांशी वाटाघाटी न करता आणि द्रव्य न देता जिंकून घेतलेला हा एकमेव किल्ला होता. मोगल सरदार खाफीरखान याविषयी म्हणतो की, मोगलांनी वाटाघाटीच्या मार्गाने न घेतलेला हा एकमेव किल्ला होय. या उद्‌गारावरून हे सिद्ध होते की, मोगल बादशहाने आतापर्यंतचे सर्व किल्ले व किल्ल्यांभोवती कित्येक महिने निष्फळ वेढे घालून आणि शेवटी वाटाघाटी करून व लाखो रुपयाचे द्रव्य मराठ्यांना देऊन घेतले होते.

बादशहा राजगडाच्या मोहिमेत गुंतला होता आणि ताराबाईंनी त्याचा फायदा घेतला. तिने मराठे फौज मोगली मुलखात चौफेर घुसवून धुमाकूळ माजवला. मराठ्यांची एक फौज विजापूरच्या प्रदेशात जाऊन तिथल्या मोगल अंमलदाराकडून चौथाईची रक्कम वसूल करीत होती, जे अधिकारी चौथाई देण्यास नकार देत त्यांना मराठे कैद करीत आणि त्यांचा मुलूख लुटून फस्त करीत जात होते.

याचवेळी शूर मराठ्यांनी उत्तरेत आणि दक्षिणेकडील प्रदेशात

ताराबाईंच्या नेतृत्वाखाली जी चौफेर भरारी मारली त्याला तोड नाही.

नेमाजी शिंदे, केसो त्रिमल व परसोजी भोसले या मराठे सरदारांनी वऱ्हाडात शिरून धुमाकूळ घातला. त्यांनी मोगलांचा प्रसिद्ध सरदार रुस्तुमखान याला कैद केले आणि ५० हजार स्वारांच्या फौजेनिशी नर्मदा पार केली. या हल्ल्यात माळव्यातील अनेक खेडी व शहरे लुटली आणि सिरोजला वेढा घातला (जानेवारी-फेब्रुवारी १७०४). मराठ्यांच्या फौजानी पार कालाबागपर्यंत आपले हातपाय पसरले होते. मराठ्यांच्या या हल्ल्याने बादशहा हादरून गेला. मराठे फौजा आग्र्यापर्यंत पोचतील या भीतीने त्याने शाहजादा बेदारबस्त आणि सरदार फिरोजंग यांना मराठ्यांचा पाठलाग करून त्यांचा बंदोबस्त करण्याचा हुकूम दिला.

मोगल सरदारांना वऱ्हाडात व माळव्यात धुमाकूळ घालणाऱ्या मराठ्यांच्या फौजामागे धावाधाव करावी लागत होती. त्यांनी मराठ्यांशी टक्कर देण्याचा प्रयत्न केला पण मराठ्यांचा पूर्ण बिमोड करणे त्यांना जमत नव्हते. अशाप्रकारे मराठ्यांची एक फौज हैदराबादहून पुढे मच्छलीपट्टनमपर्यंत पोचली होती (फेब्रुवारी १७०४). एका इटालियन इतिहासकार प्रवाशाच्या नोंदणीवरून ही फौज प्रचंड होती. त्या फौजेत बारा हजार घोडदळ व दहा हजार पायदळ यांचा समावेश होता. मच्छलीपट्टनम जवळील पालाकोल या ठिकाणावर या फौजेने हल्ला केला आणि आजूबाजूच्या प्रदेशावर हल्ला करून ते प्रदेश लुटले. तिथून चौथाई वसूल करून मराठे फौज पुढे जूनमध्ये पुन्हा हैदराबादच्या प्रदेशात चाल करून गेली होती. गोवळकोंडा शहरावर हल्ला करून मराठ्यांच्या फौजानी ते लुटले. गोवळकोंडचा सुभेदार या हल्ल्याने घाबरून गेला आणि हैदराबादच्या किल्ल्यात जाऊन लपून बसला. मात्र मराठ्यांनी त्याला सोडले नाही. त्याला अनेक प्रकारच्या धमक्या देऊन त्याच्याकडून मोठी रक्कम खंडणी म्हणून वसूल केली आणि

त्यानंतरच परत फिरले.

हे हल्ले चालू असताना मराठ्यांचा सरसेनापती धनाजी जाधव याने कर्नाटकची मोहीम आखली. तो हणमंतराव निंबाळकर आणि हिंदुराव घोरपडे यांच्यासह साठ हजार घोडदळासह कर्नाटकात घुसला (मे १७०४). एवढ्या प्रचंड फौजेपुढे कर्नाटकातील अनेक ठाणी व किल्ले मराठ्यांपुढे शरण आले.

सिरा या प्रमुख शहरी मराठे पोहचल्यानंतर त्यांनी आपल्या फौजेचे तीन विभाग केले. एक फौज सिराहून दक्षिणेत गेली आणि तेथील राजाकडून तीस लाखाची खंडणी वसूल केली. त्रिचनापल्ली राज्याच्या आसपासही त्यांनी बरीच लूट केली आणि बरीच खंडणी गोळा केली. त्यावेळी दक्षिणेत मोगलाचा सरदार दाऊदखान होता. मराठ्यांच्या प्रचंड सैन्यापुढे त्याची भंबेरी उडाली. त्याची त्रास न देण्याची विनंती मराठ्यांनी नाकारली. शेवटी त्याने घाबरून अर्काट सोडले आणि वेलोरच्या किल्ल्यात कोंडून घेतले.

मराठ्यांच्या फौजेचा दुसरा विभाग गोवळकोंड्याकडे चाल करून गेला आणि तिसरा विभाग कर्नाटकातील ठाणी व प्रदेश काबीज करण्याच्या कामगिरीला लागला होता. मराठ्यांच्या या धुमाकुळाला मोगलांचा सरदार दाऊदखान वैतागला आणि परत एकदा मराठ्यांशी तह करण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यांनी मराठ्यांनी कर्नाटकातून निघून जावे म्हणून पाच लाख रुपये दिले. मराठ्यांनी हे पैसे घेतले परंतु अदोजी व सिरा इथला प्रदेश लुटण्याचे प्रकार थांबवले नाहीत, अनेक प्रदेशांचीही त्यांनी लूट केली.

या काळात बादशहाला मराठ्यांनी महाराष्ट्रात स्वस्थ बसू दिले नव्हते. तो तिथे गुंतल्यामुळे दाऊदखानाला तो अधिकची फौज पाठवू शकला नव्हता आणि मराठ्यांचे फावले होते.

कृष्णा आणि भीमा नद्यांच्या प्रदेशात बेरड लोकांनी मराठ्यांच्या

प्रमाणेच बंड निर्माण केले होते. ते शमविणे आवश्यक होते. म्हणून खुद्द बादशहा त्यांचा बिमोड करण्यासाठी मोहीमेवर निघाला (१७०४). दक्षिणेच्या या युद्धात मराठ्यांनी बेरडांना साथ दिली आणि त्यासाठी ताराबाईंनी धनाजी व बहिर्जी यांना मोठे सैन्य देऊन बेरडांच्या मदतीला पाठविले. मराठे आणि बेरड यांनी मोगलांना चिकाटीने झुंज दिली, पण शेवटी बादशहा बेरडांची राजधानी वाकिणखेडा जिंकण्यात यशस्वी झाला (१७०५).

बादशहा बेरडांच्या मोहीमेमध्ये गुंतला होता ती संधी ताराबाईने सोडली नाही. बादशहाने जिंकून घेतलेले लोहगड, सिंहगड, राजमाची हे किल्ले ताराबाईने त्यांवर अचानक हल्ले करून मोगलांकडून जिंकून घेतले. या किल्ल्यांसाठी बादशहाने भरपूर मनुष्यबळ व द्रव्य खर्च केले होते. बादशहाची पाठ फिरताच ताराबाईने हे किल्ले सहजतया आपल्या ताब्यात आणले. अशाप्रकारे आपण द्रव्य घेऊन जिंकून घेतलेले किल्ले मराठी किती सहजरित्या हस्तगत करतात हे पाहण्याचे दुर्भाग्य बादशहावर ओढवले.

मराठ्यांचे बळ उभ्या हिंदुस्थानात जाणवू लागले होते. हे सर्व पहात बादशहा अहमदनगरच्या छावणीत बसला होता, हे आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस आहेत हे त्याला जाणवू लागले होते.

बादशहाला अहमदनगरच्या छावणीत सुखाने राहू द्यायचे नाही असेच मराठ्यांनी ठरवले होते. बादशहाला एक जबरदस्त धक्का द्यायचे ताराबाईंनी ठरविले. तिने सेनापती धनाजी जाधवांसह इतर सेनानींना बादशहाच्या छावणीवर हल्ला करण्याचा आदेश दिला. बादशहाला हल्ल्याची खबर मिळताच त्याने आपल्या सरदारांना मराठ्यांना पिटाळून लावण्याचा आदेश दिला.

अहमदनगरजवळ मराठे आणि मोगल यांच्यामध्ये धमाशान लढाई जुंपली. मराठ्यांचा जोर मोगलांना भारी पडत होता. बादशहाने आणखी

सैन्य मदतीला पाठवले. मराठ्यांनी एक युद्धनीती म्हणून आपले सैन्य मागे घेतले. मराठ्यांना बादशहाच्या मनात भीति निर्माण करायची होती. आणि तो हेतु साध्य झाला होता.

बादशहाच्या अहमदनगरच्या छावणीवरील हल्ल्यांचे काम आटोपून मराठी फौजा धनाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली गुजरात सुभ्यावर चालून गेल्या. सुरत, भडोच, बडोदा अहमदाबाद ही समृद्ध शहरे त्यांनी लुटली. गनिमी काव्याने युद्ध करणारे मराठे मोगलांना भारी पडत होते. गुजरातमध्ये मोगलांचा पराभव करून मराठी फौज महाराष्ट्रात परत आली.

मराठी फौज उत्तरेकडील मोगल सुभ्यांमध्ये धुमाकूळ घालीत असताना दक्षिणेकडेसुद्धा हिंदुराव घोरपड्यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी हल्ले केले. मराठ्यांनी बेरडांच्या मदतीने पेनुकोंडा किल्ला काबीज केला. गोवळकोंडा व कर्नाटक यांच्या सीमेवरील या किल्ल्याला महत्त्व होते. मरणासन्न बादशहाने हा किल्ला परत जिंकून घेण्याची आज्ञा केली. निव्वळ शस्त्रबळावर किल्ला जिंकता येईना तेव्हा मोगलांनी मराठ्यांस सात लाख रुपये दिले आणि दीड महिन्यानंतर किल्ला ताब्यात घेतला.

अहमदनगरच्या छावणीत बादशहा औरंगजेबाला शारीरिक विश्रांती अशी मिळत नव्हती. तो मानसिक स्वास्थ्यही हरवून बसला होता.

महाराणी ताराबाई भविष्यातील मराठी साम्राज्याचे स्वप्न पाहत होत्या आणि मोगल बादशहाला भूतकाळातील भूते भेडसावत होती. तसेच भविष्यकाळ भेसूर दिसत होता.

बादशहाची प्रकृती कमालीची ढासळली आणि त्याने शहाजादा आझमला तातडीने येण्याबद्दल निरोप धाडला आणि गुरू गोविंद सिंहना पत्र लिहीले. मात्र दोघे अहमदनगरच्या छावणीत पोहोचण्यापूर्वी

बादशहाने इहलोकाचा निरोप घेतला (२० फेब्रुवारी १७०७).

बादशहाच्या मृत्यूची बातमी साताऱ्याच्या किल्ल्यावर आली. महाराणी ताराबाई आणि मराठे सरदार तिथेच होते.

सर्वांनी महाराणी ताराबाईंचा जयजयकार केला आणि किल्ल्याचं नाव आझमतारा बदलून अजिंक्यतारा केले.

■

६. शाहूराजेंबरोबर सत्ता स्पर्धा

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहाजादा आझम बादशहापदी आरूढ झाला. मराठ्यांमध्ये दुहीचे राजकारण सुरू करण्याच्या दृष्टीने त्याने आपल्या कैदेत असलेल्या शाहू राजे यांची सुटका केली. मात्र महाराणी येसूबाई व इतर कुटुंबिय यांना सोडले नाही. त्यांना ओलीस म्हणून ठेवले.

कैदेतून बाहेर पडल्यानंतर शाहू राजेंनी अनेक मराठे सरदारांना पत्रे लिहून आपल्या आगमनाची वार्ता दिली. अहमदनगरला पोचल्यानंतर त्याने ताराबाईंकडे राज्य वाटणीसाठी वाटाघाटींचा प्रस्ताव दिला. मात्र महाराणी ताराबाई यांचे म्हणणे वेगळे होते. त्यांच्या मते राजाराम महाराजांनंतर त्यांनी मराठी राज्याचे मोगलांपासून रक्षण केले होते. त्यामुळे मराठ्यांच्या राज्यावर शाहू राजांचा काही हक्क नाही. हक्क फक्त ताराबाई व राजाराम यांच्या वारसाचा पोचतो अशी त्यांची भूमिका होती.

ताराबाईंचा शाहू राजांना पूर्णपणे विरोध होता. मोगलांकडून

सनदा मिळवून शाहू राजेंनी मोगल बादशहाची चाकरी केली म्हणून ते मराठ्यांचे स्वतंत्र राजे ठरू शकत नाहीत. आपण मात्र मराठी राज्य राखले म्हणून आपला हक्क पोचतो असे त्यांचे ठाम मत होते. जे राज्य आपण संघर्ष करून राखले ते ज्येष्ठतेच्या वारसा हक्काने शाहूना देण्यास त्यांचा विरोध होता.

अशाप्रकारे शाहू राजे आणि ताराबाई यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला. शाहू राजेनी अनेक मराठे सरदारांना वतने देऊन त्यांना आपल्याकडे वळवून घेण्यास सुरुवात केली आणि आपले सामर्थ्य वाढविले. ताराबाईंनी सुद्धा शाहू राजेंविरुद्ध जोरदार हालचाली आरंभल्या. एकूण युद्ध केल्याशिवाय हक्क मिळणार नाही हे लक्षात येताच शाहू राजेंनी युद्धाची तयारी केली.

अहमदनगरहून शाहू राजे साताऱ्याकडे निघाले. ताराबाईंनी आपले सैन्य चाल करण्यास पाठवले. शाहू राजे यांचे सैन्य कमी होते. त्यांनी भेदनीतिचा अवलंब केला. ताराबाईंचा अनुभवी सेनापती धनाजी जाधवला आपल्याकडे वळवले. छत्रपती घराण्यातील या दोन वारशांच्या संघर्षाची पहिली चकमक भीमा नदीकाठच्या खेड इथे उडाली (१७०८). या लढाईत शाहू राजेंना मोठा विजय मिळाला आणि त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यांनी खेडपासून साताऱ्याला येईपर्यंत विजय मिळविले आणि त्याचे कारण होते ताराबाईंकडून फुटलेले अनेक सरदार. त्यांना देशमुखीची आमिषे दाखवून त्यांनी आपल्याकडे वळवले होते.

शाहू राजेंनी सातारा इथे राज्याभिषेक करून घेतला (१२ जानेवारी १७०८) आणि आपल्या अष्टप्रधानांची नेमणूक केली. खेडमध्ये पराभव झाला तरी ताराबाई खचल्या नाहीत आणि पन्हाळ्याच्या बाजूला त्यांनी सैन्याची जुळवाजुळव सुरू केली. या काळात दोन्ही पक्षांमध्ये छोट्यामोठ्या लढाया सातारा आणि पन्हाळा या दरम्यानच्या प्रदेशात

सुरू राहिल्या होत्या. शाहू राजेंनी पन्हाळा, वसंतगड, पावनगड इ. किल्ले विजय मिळवून घेतले. ताराबाईंनी अस्वस्थ होऊन आपले सामर्थ्य वाढवले. पन्हाळा आणि दक्षिणेकडली मोक्याची ठाणी परत आपल्या ताब्यात आणली.

शाहू राजांचा अडसर दूर करण्यासाठी ताराबाईंनी पन्हाळा येथे मराठ्याची नवी गादी स्थापन केली आणि आपला पुत्र शिवाजी याच्या नावे छत्रपतीपदाची द्वाही फिरवली. रामचंद्रपंत अमात्य यांना ताराबाईंचा हा विचार पसंत पडला नव्हता. त्यांचा कल शाहू राजेंकडे होता. संभाजी महाराजांचे पुत्र म्हणून ते राज्याचे वारसदार ठरतात असे त्यांना वाटत होते. शाहू राजांशी करार केल्याच्या आरोपावरून ताराबाईंनी त्यांना कैदेत ठेवले. मात्र पुढे त्यांनी छत्रपतीशी एकनिष्ठ राहण्याचे ठरविले आणि त्यांचा अनुभव लक्षात घेऊन सुटका करण्यात आली.

शाहू महाराज आणि ताराबाई यांच्यामधील सत्तास्पर्धा तसेच डावपेचांचे राजकारण चालूच होते. १७१० ते १७१४ या काळामध्ये ताराबाईंनी आपल्या राज्याला बळकटी आणण्याचा अनेक मार्गांनी प्रयत्न केला आणि त्याचवेळी शाहू राजेंना जितक्या प्रकारे विरोध करून त्रास देता येईल ते केले.

अशा या अस्थिर परिस्थितीत कोल्हापूरला एक घटना घडली. त्या घटनेला ‘कोल्हापूरची रक्तहीन राज्यक्रांती’ असे नाव पडले आहे. ती मोठी रोमहर्षक घटना होती.

■

७. कोल्हापूरची रक्तहीन क्रांती

कोल्हापूरच्या इतिहासातील ही रक्तहीन क्रांती केली होती, राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसबाई हिने. राजसबाई आणि तिचा पुत्र संभाजी यांनी ताराबाईंना कुठलीही खबर लागू न देता त्यांच्या पक्षातील लोकांना आपल्या बाजूला फितूर करून घेतले आणि कोल्हापूरची राजसत्ता आपल्या ताब्यात घेतली. त्यांनी महाराणी ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी यांना कैद करून पन्हाळगडावर ठेवले.

अशा प्रकारे राजसबाईंचे पुत्र संभाजी कोल्हापूरच्या गादीवर बसले आणि त्यांच्या नावे नवी राजवट सुरू झाली. ही एक प्रकारची रक्तहीन क्रांती होती आणि त्याला कारण होते ताराबाईंचा एककल्ली कारभार. त्यांचे स्वयंभूपण अनेक मुत्सद्यांना आवडत नव्हते. त्यात रामचंद्र अमात्य यांचाही समावेश होता. कारण त्यांच्या सक्रीय सहभागाशिवाय राजसबाई हे धाडस करायला धजावल्या नसत्या. मात्र या सत्तांतरामधून मराठ्यांच्या राजघराण्यात स्वार्थापायी कसा अविचार येऊ लागला होता याचे दर्शन घडले होते. महाराणी ताराबाईंनी राजाराम

महाराजांनंतर मोगल बादशहाबरोबर केलेला संघर्ष, त्यांनी केलेले प्रयत्न आणि मिळवलेले यश याचा विचार संबंधित मंडळींना करावासा वाटला नव्हता.

ताराबाईंसारख्या धुरंधर स्त्रीच्या बाबतीत हा असा प्रसंग उद्‌भवावा हे खूपच आश्चर्यकारक होते. मात्र सत्तांतर घडले आणि राजसबाई आपला पुत्र संभाजीच्या नावे राज्यकारभार करू लागल्या.

१७१४ ते १७३० या दीर्घकाळात ताराबाई आपला पुत्र शिवाजी आणि त्याच्या दोन राण्या यांच्यासह नजरकैदेत होत्या. १७२६ मध्ये ताराबाईंचा पुत्र शिवाजी हा देवीच्या आजारामध्ये मृत्यू पावला. त्यावेळी त्याची पत्नी भवानीबाई गरोदर होती. तिला मुलगा झाला. या मुलाला करवीरचे संभाजी आणि त्याची पत्नी जिजाबाई यांना धोका होण्याची शक्यता ताराबाईंना वाटली आणि त्यांनी आपल्या नातवाच्या सुरक्षिततेसाठी त्याला भगवंतराव अमात्य यांच्याकडे सोपवले. भगवंतराव अमात्य यांच्या पत्नीने या मुलाचे पुत्रवत पालन केले.

मध्यंतरीच्या काळात सातारचे शाहू महाराज आणि कोल्हापूरचे

संभाजी राजे यांच्याकडे अनेकवेळा संघर्षाचे प्रसंग आले. या दोघांमधील तेढ वारणेच्या तहाने संपुष्टात आली. वारणेच्या या तहाद्वारे मराठा सत्तेतील अंतर्गत संघर्ष समाप्त झाला. (१३ एप्रिल १७३१).

या तहामुळे शाहू महाराजांची प्रतिष्ठा वाढली. या तहानंतर कोल्हापूरला संभाजी राजेंच्या कैदेत असलेल्या ताराबाई या साताऱ्याला शाहूंकडे गेल्या. खरं म्हणजे शाहू महाराजांना ताराबाईंनी कोल्हापूरला जावं असं वाटत होतं. मात्र ताराबाईंना कोल्हापूरला जायचे नव्हते. तिथली हवा त्यांना मानवत नव्हती आणि त्यांच्या मते आपल्याला दोन्हीकडे कैदेतच राहायचे आहे तर मग साताऱ्याला राहू. ताराबाईंच्या या म्हणण्याचा शाहू महाराजांनी मान राखला आणि ताराबाई सातारला आल्या.

साताऱ्याला ताराबाईंची राहण्याची उत्तम व्यवस्था तेथील किल्ल्यावरील राजवाड्यात शाहूराजांनी केली होती. आणि यादो गोपाळ यांना त्यांच्या व्यवस्थेची देखभाल करण्याचे काम सोपवले होते. सातारा येथील राजवाड्यात ताराबाई सुमारे सोळा ते सतरा वर्षे होत्या. इथे असताना अनेक वेळा शाहू महाराज आणि पुण्याचे पेशवे यांच्यामध्ये काही संघर्ष निर्माण झाल्यास मध्यस्थी करणे, पेशव्यांना समजावणे किंवा शाहू महाराजांना सल्ला देणे अशा कामात त्या वेळ घालवित होत्या. मात्र संभाजीच्या कैदेत पन्हाळगडावरची पंधरा-सोळा वर्षे आणि शाहू महाराजांच्या आश्रयाखाली त्यांना काढावी लागलेली अठरा वर्षे असा एकूण चौतीस एक वर्षांचा दीर्घ कालखंड ताराबाईंसारख्या लढवय्या, शूर व महत्त्वाकांक्षी स्त्रीने कसा काढला असेल आणि त्यांना किती मनस्ताप सोसावा लागला असेल याची कल्पना मन विषन्न करणारी आहे. इतिहासात त्याविषयी नोंदीही नाहीत.

■

८. सातारचे राजकारण

ताराबाई साताऱ्याला शाहू महाराजांच्या कैदेत असताना सातारच्या राजकारणामध्ये अनेक घडामोडी घडत होत्या. शाहू महाराजांना तीन राण्या होत्या. मात्र त्यांना पुत्र संतान नव्हते. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मनात वारशासंदर्भात चिंता निर्माण झाली होती. त्यांचे वयोमानही झाले होते. त्यामुळे तब्बेत ठीक राहत नव्हती आणि त्याच्यात भर म्हणून त्यांना तिन्ही राण्यांमुळे खूप मानसिक त्रास सहन करावा लागत होता. आपल्या राज्याच्या वारशासंबंधीचा प्रश्न एकदाचा निकालात काढावा म्हणून रजपूत घराण्यातील एखादा चांगला मुलगा दत्तक घेण्याचे त्यांच्या मनात येत होते. उदयपूरच्या राणाचा बंधू नाथोजी हा त्यांना दत्तक पुत्र म्हणून योग्य वाटत होता. मात्र त्याच दरम्यान नाथोजीला नागोरची जहागिरी मिळाल्यामुळे शाहू महाराजांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले नाही.

काहींनी कोल्हापूरचे संभाजी राजे यांचे नाव सूचवले. मात्र शाहू महाराजांना ते पसंत नव्हते दोन कारणांसाठी. एक म्हणजे राज्यकारभार सांभाळण्याच्या दृष्टीने ते कर्तबगार नव्हते आणि दुसरे

म्हणजे त्यांनाही संतान नसल्यामुळे त्यांच्यानंतर वारशाचा प्रश्न पुन्हा उभा राहण्याचा धोका होता. त्यानंतर रघुजी भोसले यांचा मुलगा मुथोजी याला दत्तक घ्यायचा विचार पुढे आला. पण त्या दरम्यान ताराबाईंचे लक्ष या प्रश्नाकडे वळले. एकूण शाहू महाराजांच्या मनःस्थितीचा अंदाज आल्यावर ताराबाईंना ही परिस्थिती खूप अनुकूल वाटली आणि चतुर ताराबाईंने या स्थितीचा फायदा घ्यायचे ठरविले.

ताराबाईंनी शाहू महाराजांना म्हटले, 'आपला वंश असताना एक मुलगा दत्तक का घेता आहात?' शाहूनी त्यावर शंका उपस्थित केल्यावर ताराबाईंनी सविस्तर सांगितले. खुलासा करताना त्या म्हणाल्या, 'आमचा पुत्र शिवाजीच्या मृत्यूच्यावेळी त्याची पत्नी भवानीबाई ही गरोदर होती. शिवाजीच्या मृत्यूच्या आधी तीन महिने तिला मुलगा झाला. आपल्या नातवाला कोल्हापूरकर संभाजी व त्याची पत्नी जिजाबाई यांच्यापासून धोका असल्याने तो सुरक्षित राहावा म्हणून मी नातू वारल्याचे खोटे वृत्त पसरवले होते. त्या नातवाला गुप्तपणे किल्ल्याखाली पाठवून दिले. हा मुलगा जिवंत आहे. तो

आता मोठ्ठा झाला आहे. तेव्हा त्याला आणून दत्तक घ्यावा. दुसऱ्या कुठल्या मुलाचा विचार करू नये.'

शाहू महाराजांची पत्नी सकवारबाई यांना ताराबाईंचा हा बनाव वाटत होता. सत्तेसाठी त्या हे कुभांड रचत आहेत, तेव्हा त्यांच्या बोलण्यावर विश्वास न ठेवता कोल्हापूरचे संभाजी राजा यांना साताऱ्यास आणून गादीवर बसवावे असे वाटत होते. शाहू महाराजांना राणीचे हे म्हणणे पटत नव्हते. त्यांना ताराबाईंच्या म्हणण्यावर विश्वास ठेवावा असे वाटत होते. त्यांनी ताराबाईंना हा मुलगा आपला नातू आहे हे सिद्ध करण्यास सांगितले. छत्रपतींच्या वंशातील नजीकचा वंशज दत्तक घेण्यासाठी मिळतो आहे, ही बाब त्यांना आनंदाची वाटली. शाहूराजांनी स्वतःही प्रयत्न केले. त्यांनी गोविंदराव चिटणीस यांना ताराबाईंकडे पाठवले. आपल्या नातवाचे म्हणजे रामराजाचे सर्व बालपण भगवंतराव अमात्यांच्या घरी गेले आहे. त्यांना सर्व माहिती आहे असे ताराबाईंनी चिटणीसांना सांगितले. त्याप्रमाणे भगवंतराव अमात्यांना बोलावण्यात आले. त्यांना रामराजांची जन्मविषयक सत्य बाजू शपथपूर्वक सांगण्याची आज्ञा राजांनी केली. भगवंतरावांनी ताराबाईंच्या म्हणण्याला पाठिंबा दिला आणि कृष्णेचे उदक घेऊन आपले म्हणणे खरे असल्याचे सांगितले.

भगवंतरावांच्या कथनानंतर शाहू महाराजांची खात्री पटली आणि रामराजास दत्तक घेण्याचे नक्की केले. शाहू महाराजांची पत्नी सकवारबाई हिला हा निर्णय मान्य झाला नाही. मात्र तिच्या मताकडे दुर्लक्ष करण्यात आले.

इ.स. १७४८ मध्ये शाहू महाराजांची तब्बेत अधिक ढासळत गेली. त्यांनी नानासाहेब पेशवा, महादेव पुरंदरे आणि गोविंद खंडेराव चिटणीस यांना बोलावून घेतले. त्यांच्या मनात राज्याच्या भावी व्यवस्थेविषयी काही योजना आहेत का, त्याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न

केला. तब्बेत साथ देत नव्हती म्हणून या सरदारांना रामराजाला गादीवर लवकर बसविण्याची निकड सांगितली.

मात्र रामराजाला साताऱ्याला आणण्यापूर्वीच शाहू महाराजांचे निधन झाले. (१५ डिसेंबर १७४९).

शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर लगेच काही सरदार पाच हजार फौजेसह पानगावला गेले. त्यांनी रामराजा, दर्याबाई आणि इतर मंडळींना लवाजम्यासह थाटामाटात साताऱ्याला आणले. रामराजे आणि ताराबाईंची भेट झाली (२६ डिसेंबर १७४९). दुसऱ्या दिवशी पेशव्यांनी भेट घेतली.

४ जानेवारी १७५० या दिवशी रामराजे यांचे शाहू नगरीत स्वागत झाले आणि त्याच दिवशी संध्याकाळी ते राजसिंहासनावर आरूढ झाले.

■

९. रामराजा राजसिंहासनावर

रामराजा सातारच्या गादीवर बसले त्यावेळी पुण्याला बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब हे मुख्य पेशवे होते. सातारला कैदेत राहिल्यामुळे ताराबाईंचे राजकारण व कर्तृत्व बराच काळ बंदिस्त झाले होते. रामराजा हा त्यांचा नातू गादीवर आला आणि त्यांना मोकळे झाल्यासारखे वाटले. आता राजकारणात येण्यासाठी त्यांनी धडपड सुरू केली.

खरं म्हणजे ताराबाई या तीन पिढ्यांच्या राजकारणाच्या साक्षीदार होत्या. त्यांना युद्धकलेचा आणि राज्यकारभाराचा अनुभवही दांडगा होता. त्यामुळे रामराजा गादीवर येताच सातारच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती येतील अशी त्यांची अटकळ होती. त्यामुळे त्यांनी सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याचवेळेला पेशवे सुद्धा शांत बसले नव्हते. रामराजाला आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचे त्यांचे डावपेचही सुरू झाले होते.

त्यावेळी मराठी राज्यामधील राजकारण पूर्वीपेक्षा कितीतरी बदलले होते. आता राजकारणात मोगल एकटे नव्हते. राजकारणाच्या

सारीपाटावर इंग्रज, फ्रेंच, निजाम हे मोहरे देखील आले होते आणि त्या सर्वांशी मराठ्यांना लढावे लागत होते. राज्याचा व्याप वाढला होता. मराठे आता दिल्लीपर्यंत पोचले होते. बदललेल्या राजकारणाला सामोरे जायला अनुभवी पेशवे हे सामर्थ्यवान आहेत हे रामराजाला कळून चुकले होते. त्यामुळे रामराजा पेशव्यांना विरोध न करता त्यांच्या तंत्राने वागू लागला होता. ताराबाईंचे मत वेगळ होते. तिला वाटत होते. रामराजाने पेशव्यांचे वर्चस्व नाकारावे आणि आपल्या तंत्राने कारभार करावा.

ताराबाई या रामराजांच्या आजी होत्या आणि त्यांच्याच प्रयत्नाने व डावपेचामुळे तो राज्याच्या गादीवर बसला होता. त्यामुळे त्यांना दुखवणे त्याच्या जीवावर आले होते. अशाप्रकारे ताराबाई आणि नानासाहेब पेशवे या दोन जबरदस्त महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या कचाट्यात रामराजे सापडले आणि त्यांची ओढाताण झाली.

पेशव्यांच्या आदेशानुसार ताराबाईंनी सल्लागाराची भूमिका स्वीकारून निवृत्ती घ्यावी असे रामराजांनी ताराबाईंना सूचवले. ताराबाईंना हा अपमान वाटला आणि त्यांनी रामराजासंबंधी कडक धोरण स्वीकारण्याचे स्वीकारले.

सिंहगड किल्ला ताराबाईंच्या ताब्यात होता. हा किल्ला राज्यकारभाराच्या दृष्टीने पेशव्यांना स्वतःच ताब्यात असणे इष्ट वाटत होते. पेशव्यांनी ताराबाईंकडे या किल्ल्याची मागणी केली. परंतु ताराबाईंनी काहीच हालचाल न केल्यामुळे पेशव्यांना तो सैन्यबळावर ताब्यात घ्यावा लागला. ताराबाईंची नाराजी दूर करण्यासाठी पेशव्यांनी त्यांना मसलतीसाठी पुण्याला बोलावले आणि त्यांचे धनी या नात्याने भव्य स्वागत केले. पाच हजार रुपये रोख आणि इतर बराच नजराणा दिला. ताराबाई ४-५ महिने पुण्यात वास्तव्यास होत्या. पुढे त्या साताऱ्याला आल्या परंतु सिंहगड ताब्यातून गेल्याचे दुःख त्यांच्या

मनात होते. मनात धुमसणाऱ्या या आगीत आणखी एका गोष्टीची भर पडली. पेशव्यांनी सांगोले आणि मंगळवेढे या स्थळांची मागणी केली. कारभारी शिवदेव याने युद्ध आरंभले तेव्हा पेशव्यांनी चढाई करून तो प्रदेश जिंकला.

अशाप्रकारे साताराच्या आसपासचा प्रदेश पेशव्यांच्या हातात आला होता. त्यामुळे साताऱ्यावर त्यांना जम बसविता आला. या प्रकाराने ताराबाई चिडल्या, साताराच्या राजाने पेशव्यांच्या आहारी जाणे त्यांना पटले नाही.

■

१०. ताराबाई आणि पेशवे

मराठ्यांची सातारची राजसत्ता लयाला जाऊन पेशवेच सर्वाधिकारी बनत आहेत. ही स्थिती चाणाक्ष ताराबाईंच्या लगेच ध्यानात आली. तिच्या स्वतंत्र बाण्याला हे रूचणारे नव्हते. तिने पेशव्यांना विरोध करण्याचा निर्धार केला. रघुजी भोसल्यांसारखा पराक्रमी सरदारसुद्धा पेशव्यांना भिऊन राहत असे. ताराबाई या सर्वांहून वेगळी होती आणि म्हणून ती पेशव्यांच्या सार्वभौम शक्तीला आव्हान देण्यास तयार झाली.

ताराबाईंच्या या निर्धाराने पेशवेसुद्धा डळमळले. परंतु त्यांनी स्वतःला सावरले. पेशव्यांनी सत्ताकेंद्र पुण्याला नेले या गोष्टीचा ताराबाईला राग आला आणि तिने पेशव्यांना त्रास द्यायला सुरुवात केली. वेळ साधून ताराबाईंनी रामराजाला अटक केले आणि सातारच्या किल्ल्यात ठेवले. रामराजाला अटक केल्यानंतर तिने पेशव्यांच्या विरोधकांना हाताशी धरले. गुजरातेत दाभाडे व गायकवाड यांना पेशव्यांविरुद्ध चिथावले. निजाम, फ्रेंच, पोर्तुगीज यांच्याशी तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. त्यांनीही ताराबाईंना मोठे नजराणे पाठवून खुषी

व्यक्त केली. पेशव्यांनी एवढे होऊनही त्याला विरोध केला नाही. त्यांनी सबुरीचे धोरण पत्करले. ताराबाई आणि रामराजा यांच्या भानगडीत पडण्याचाही त्यांचा विचार नव्हता. त्यामुळे सातारच्या किल्ल्याला वेढा घालून नानासाहेब पेशव्यांनी ताराबाईंशी नमते घेतले. ताराबाई धनी होती आणि पेशवे सेवक होते हे त्यांना पक्के ठाऊक होते.

मराठ्यांच्या या अंतर्गत राजकीय गोंधळाचा फायदा शत्रूने घेतला नसता तरच नवल होते. निजाम पुण्यावर चाल करून आला. परक्या शत्रूशी एकजुटीने लढण्याची गरज पेशव्यांनी ताराबाईंना पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु ताराबाईंनी दखल घेतली नाही. नानासाहेब पेशव्यांनी निजामाचा पराभव केला. पेशव्यांनी शिंदे-होळकर यांच्यातील भांडणे मिटवून त्यांचे संधान दिल्लीशी जोडून दिले. गायकवाडांशी युद्ध करून वर्धा गुजरात स्वतःच्या ताब्यात घेतला. वारणेच्या काठावर तीन हजारांची फौज ठेवून कोल्हापूरकर संभाजीला शह दिला. अशा प्रकारे ताराबाईंचे हात बाहेरच्या प्रदेशात पोचणार नाहीत याची सर्वतोपरी काळजी पेशव्यांनी घेतली.

नानासाहेब पेशव्यांनी निजामाचा पराभव केला आणि ते साताऱ्याला आले. पेशव्यांचा असा कयास होता की, निजामावरील विजयामुळे तरी ताराबाईंची नाराजी दूर होईल आणि त्या समेटास तयार होतील पण ताराबाई बधल्या नाहीत. आता मात्र ताराबाईंसमोर आपण जर कलते घेतले तरच उपयोग होईल हे अनुभवी पेशव्यांच्या लक्षात आले. त्यामुळे नानासाहेब पेशवे अधूनमधून ताराबाईंच्या दर्शनास जाऊ लागले. मसलतीसाठी जायच्या अगोदर त्यांची परवानगी घेऊ लागले आणि आल्यावरही कळवू लागले.

साताऱ्याला सखो महादेव हा कारभारी ताराबाईंच्या वतीने पेशव्यांशी बोलणी करीत असे. एका पत्रामधून पेशव्यांनी सखो महादेव

यांना कळवले होते की, ताराबाई आपल्याला बोलवत नाहीत. कामकाज सांगत नाहीत. या बाबीवरून पेशव्यांची ताराबाईंशी समेट करण्याची अगतिकता दिसून आली होती कारण त्यांनी ताराबाईंची योग्यता जाणली होती.

कोणत्याही उपायांनी का होईना ताराबाई आणि रामराजे किल्ल्यावरून खाली यावेत म्हणजे रामराजे यांना हाताशी धरून आपली योजना सिद्धीस नेण्याचे मनसुबे पूर्ण होतील असे पेशव्यांना वाटत होते. शेवटी ताराबाईंकडून समेटासंबंधी सूचक निरोप मिळाला आणि पेशव्यांना हायसे वाटले. त्यांनी आपली संमती दर्शविली. सप्टेंबर १७५१ मध्ये पेशवे आणि ताराबाई यांच्यामध्ये समेटाची बोलणी झाली आणि त्याप्रमाणे एक यादी तयार करण्यात आली.

दोघांचा समेट झाल्यानंतर दि. १२ ऑक्टोबर १७५१ रोजी ताराबाई रामराजांसह किल्ल्यावरून खाली आल्या आणि फत्तेसिंह भोसले यांच्या वाड्यात त्या राहू लागल्या.

यानंतर सातारच्या राज्यकारभाराची सर्व सूत्रे ताराबाईंनी आपल्या हातात घेतली. पेशव्यांनी वेळोवेळी रामराजेंना ताराबाईंच्या कैदेतून सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी होऊ शकला नाही. रामराजेंना प्यादे करून त्यांच्या मार्फत राज्यकारभार हाकण्याचा पेशव्यांचा मानस होता. तो ताराबाईंच्या कठोर निर्धारामुळे तडीस गेला नाही.

■

११. राज्यकारभार पुन्हा ताराबाईंकडे आणि अखेर

इ.स. १७५२ पासून इ.स. १७६१ पर्यंत म्हणजे मृत्यूपर्यंत जवळपास दहा वर्षे सातारच्या किल्ल्यात राहून ताराबाईंनी सातारच्या गादीचा कारभार चांगला सांभाळला.

ताराबाईंनी या कालखंडात प्रजेचे हीत पाहून जो राज्यकारभार केला त्याची अनेक उदाहरणे आहेत. शिवाजी महाराजांनी ब्राह्मणांना धार्मिक कार्यासाठी गावे इनाम दिली होती. या ब्राह्मण मंडळींना, त्यांच्या या इनाम जमिनीमध्ये वसुलीसाठी सरदार तुळाजी आंग्रे याने उपद्रव देण्यास प्रारंभ केला तेव्हा ब्राह्मणांनी ताराबाईंकडे दाद मागितली. ताराबाईंनी तुळाजी आंग्रेच्या उपद्रवाचा बंदोबस्त करून ब्राह्मणांना त्यांची इनामे परत मिळवून दिली.

सरदार तुळाजी आंग्रे याने विशाळगडाला वेढा घातल्याची बातमी ताराबाईंपर्यंत आली. तेव्हा त्यांनी प्रतिनिधीना आदेश दिला आणि आंग्रेनी थकलेला सारा आधी सरकारजमा करावा असा हुकून काढण्यास फर्मावले. एकूण सरकारी सारा वसूल करण्यामध्ये त्या अतिशय चोख होत्या. हे या उदाहरणावरून दिसते. शाहूच्या दरबारातील सदाशिव दीक्षित ठाकूर याने ताराबाई व नानासाहेब पेशवे

यांच्यात समेट घडवून आणला. त्याबद्दल त्यास त्यांनी १५ हजार रुपये बक्षीस पेशव्यांकडून दिले.

राघोबादादा व माधवराव पेशवे यांच्या विनंतीवरून ताराबाईंनी जानोजी भोसले यास सेनासाहेब सरखेल हा किताब दिला. तसेच ताराबाईंनी घरगुती तंट्याबाबतही अनेक निवाडे केले.

अगदी आपल्या आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी इनाम देणे, वतने देणे अशा बाबींमध्ये लक्ष घातल्याचे दिसते. आपल्या मृत्यूच्या सात दिवस आधी म्हणजे ३ डिसेंबर १७६१ या दिवशी त्यांनी यज्ञेश्वर विनायक दीक्षित आठले या गृहस्थास भणग हा गाव इनाम दिला आणि त्यानंतर बरोबर सात दिवसांनी म्हणजे १० डिसेंबर १७६१ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

वयाच्या २५ व्या वर्षी ताराबाईंनी मराठी राजकारणात प्रवेश केला आणि वयाच्या ८६ व्या वर्षापर्यंत त्या क्षेत्रात त्यांचा अविरत प्रवास झाला. आपल्या कर्तृत्वाने ताराबाईंनी मराठी राज्य तेजस्वी आणि समृद्ध केले.

महाराणी ताराबाईंच्या एकूण कार्याचा आढावा घेताना त्यांच्यामधील महत्त्वाकांक्षा स्पष्टपणे दिसते तसेच राजाराम महाराजांच्या निधनानंतर मराठा राज्याच्या आधारस्तंभ बनून त्यांनी ते राखले हेही लक्षात येते आणि मराठी साम्राज्यामधील स्त्रिया देखील कर्तृत्व दाखवतात हे सिद्ध केले.

इ.स. १७०० ते १७०७ या कालावधीत त्या औरंगजेबाशी लढण्यात गुंतलेल्या होत्या. तरी त्यांनी स्वराज्याकडे दुर्लक्ष केले नाही. मोगलांशी लढण्यासाठी आर्थिक बाजू भक्कम राहावी म्हणून त्यांनी त्याकडे जातीने लक्ष दिले. जेव्हा आर्थिक तुटवडा राज्याला जाणवू लागला तेव्हा वेगवेगळ्या मार्गांनी कर जमा करण्याचा प्रयत्न केला. सैन्याला पगार देण्यासाठी पैसा अपूरा पडतो आहे हे लक्षात येताच त्यांनी पराक्रम गाजवलेल्या सरदारांना इनाम म्हणून वतने देण्यास प्रारंभ केला. युद्धामध्ये कामी आलेल्या सरदारांच्या नातेवाईकांना मोकासा जमिनी नावावर करून दिल्या.

राज्यातील दरोडेखोरी, लुटमारी यावर त्यांची करडी नजर असे. बेरड मंडळींना त्यांनी ताकीद देऊन त्यांच्या गोंधळावर पायबंद घातला आणि प्रजेचे संरक्षण केले.

मुलकी काराभारामध्ये जसे त्यांचे लक्ष होते तसेच धार्मिक कार्यामध्ये त्या जागरूक होत्या. अनेक धार्मिक कार्यामध्ये त्यांनी आर्थिक सहकार्य केले आणि मंदिरांसाठी जमिनी इनाम दिल्या.

औरंगजेबासारखा बलाढ्य शत्रूला आपल्या पराक्रमाने आणि मुत्सद्देगिरीने चीत करून ताराबाईंनी मराठी राज्याचे रक्षण केले. इतकेच नव्हे तर मराठी राज्याचा दरारा दक्षिणोत्तर वाढविला. त्यामुळे मराठा इतिहासातील एक लढवय्यी महान स्त्री म्हणून महाराणी ताराबाई यांचे स्थान नेहमीच अढळ राहणार आहे.

■